



# गोदातीर समाचार

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026
संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com





* वर्ष ६४ वे * अंक २१० * नांदेड * बुधवार, दि. ६ ऑगस्ट २०२५ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎: 255777, Fax :252211

# स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका डिसेंबर-जानेवारीमध्ये

## व्हीव्हीपॅट मशीन नसेल वापरात

**मुंबई (प्रतिनिधी)–** राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांबाबत अखेर मोठा निर्णय घेण्यात आला आहे. राज्य निवडणूक आयोगाने महत्त्वाची घोषणा करत ग्रामीण भागातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या कार्यक्रमाचा अंदाज जाहीर केला आहे. यात नगरपंचायती, नगरपरिषद, जिल्हा परिषद, पंचायत समित्या या सर्वच प्रकारच्या संस्थांचा समावेश आहे. राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूका दिवाळीनंतर म्हणजेच डिसेंबर-जानेवारीमध्ये होणार आहेत असं राज्य निवडणूक आयोगाचे आयुक्त दिनेश वाघमारे यांनी दिली आहे.

राज्यात दिवाळीनंतर होणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांबाबत राज्य निवडणूक आयोगाने महत्त्वपूर्ण घोषणा केली आहे. यंदाच्या निवडणुकांमध्ये व्हीव्हीपॅट मशीनचा वापर केला जाणार नाही, अशी स्पष्ट माहिती आयोगाने दिली आहे. यासोबतच या निवडणुका टप्प्याटप्प्याने पार पाडण्यात येणार आहेत, असेही सांगण्यात आले. महत्त्वाचे म्हणजे, नवीन प्रभाग रचनेनुसार आणि ओबीसी आरक्षणासह या निवडणुका घेण्यास अधिकृत मंजुरी मिळाली आहे. सोमवारी यासंदर्भातील परवानगी राज्य निवडणूक आयोगाला मिळाली. यापूर्वी नव्या प्रभाग रचनेला आव्हान देणाऱ्या काही याचिका सुप्रीम कोर्टात दाखल करण्यात आल्या होत्या, मात्र सर्वोच्च न्यायालयाने त्या याचिका फेटाळून लावल्या, त्यामुळे या निवडणुकांचा मार्ग आता मोकळा झाला आहे. राज्यातील अनेक महत्त्वाच्या महापालिकांमध्ये मुंबई, पुणे, पिंपरी-चिंचवड, नाशिक नव्या प्रभाग रचनेनुसार बदल करण्यात आले होते. हे बदल आता वैध ठरले असून त्याच पद्धतीने आणि ओबीसी आरक्षण लागू करूनच निवडणुका घेतल्या जाणार आहेत. ही निवडणूक प्रक्रिया केवळ राजकीय पक्षांसाठी नव्हे, तर स्थानिक स्तरावर काम करणाऱ्या नेतृत्वासाठीही अत्यंत निर्णायक ठरणार आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांचा




कारभार पारदर्शक आणि सर्वसमावेशक करण्याच्या दृष्टीने ही निवडणूक पायाभूत ठरणार आहे.

राज्य निवडणूक आयोगाने अलीकडेच राज्यातील विविध महानगरपालिकांमध्ये प्रभाग रचनेसंदर्भात महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. 'अ', 'ब' आणि 'क' वर्गातील महानगरपालिकांमध्ये आता चार सदस्यीय प्रभाग रचना लागू करण्यात येणार आहे. या आदेशानुसार, या महापालिकांमध्ये निवडणुका एकाच प्रभागातून चार नगरसेवक निवडण्याच्या पद्धतीने पार पडणार आहेत.

मुंबईतील महापालिका निवडणुकीसंदर्भात मोठा निर्णय घेण्यात आला आहे. या निवडणुका जुन्याच प्रभाग रचनेनुसार, म्हणजेच २२७ एकसदस्यीय प्रभागांनुसार पार पडणार आहेत. मुंबई महानगरपालिकेतील प्रभागांची संख्या पूर्वीही २२७ इतकीच होती, मात्र महाविकास आघाडी सरकारच्या काळात या प्रभागांमध्ये वाढ करून २३६ प्रभागांची नव्याने रचना करण्यात आली होती. मात्र नंतर राज्यात महायुती सरकार सत्तेत आल्यानंतर, या निर्णयावर पुनर्विचार करण्यात आला आणि पुन्हा एकदा २२७ प्रभागांवरच अंतिम शिक्काम ोर्तब करण्यात आले. या नवीन निर्णयाला आव्हान देत सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली होती, मात्र सुप्रीम कोर्टाने ती याचिका फेटाळून लावल्यामुळे, मुंबईतील महापालिका निवडणुका आता पूर्वीप्रमाणे २२७ प्रभागांमध्येच होणार हे निश्चित झाले आहे. दरम्यान, मुंबई वगळता इतर प्रमुख शहरांमधील महापालिकांमध्ये जसे की पुणे, नागपूर, ठाणे, नाशिक, नवी मुंबई, पिंपरी चिंचवड, छत्रपती संभाजीनगर चार सदस्यीय प्रभाग रचना लागू राहणार आहे. त्यामुळे मुंबईत जरी जुनी प्रभागरचना कायम ठेवण्यात आली असली, तरी इतर ठिकाणी नव्या चौकटीत निवडणुका होणार आहेत. हा निर्णय मुंबईतील राजकीय समीकरणांवर आणि निवडणूक रणनीतीवर मोठा परिणाम करणारा ठरणार आहे.

## उपमुख्यमंत्री अजित पवार आज नांदेड दौऱ्यावर

**नांदेड (प्रतिनिधी)–** राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार हे आज दि. ६ ऑगस्ट रोजी नांदेड दौऱ्यावर येत आहेत.



राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार हे बुधवार, दि. ६ ऑगस्ट २०२५ रोजी मुंबई येथुन विमानाने दुपारी १.२० वाजता श्री गुरू गोविंद सिंघजी विमानतळ नांदेड येथे आगमन. त्यानंतर मोटारीने प्रयाण. दुपारी १.३० वाजता माजी खासदार भास्करराव पाटील-खतगावकर यांचे निवासस्थान साई निवास महात्मा फुले हायस्कुलजवळ यशवंत कॉलेजरोड बाबानगर नांदेड येथे आगमन. दुपारी १.३० वाजता नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या माजी संचालिका कै. सौ. स्नेहलता भास्करराव पाटील खतगावकर यांच्या दु:खद निधनानिमित्त सात्वंनपर भेट. त्यानंतर दुपारी २.२५ वाजता श्री गुरू गोविंद सिंघजी विमानतळ नांदेड येथे आगमन. दुपारी २.३० वाजता हेलिकॉप्टरने बीडकडे प्रयाण करतील.

## चिंता वाढली; महाराष्ट्रात पावसाचा जोर ओसरणार

**मुंबई (प्रतिनिधी)–** हवामान विभागानं वर्तवलेल्या नव्या अंदाजानुसार मध्य भारत आणि महाराष्ट्रात पावसाचा जोर ओसरण्याची शक्यता आहे. हवामान विभागानं वर्तवलेल्या अंदाजानुसार राज्यात मान्सूनची अवस्था सध्या कमजोर झाली आहे. पुढील दोन आठवडे तरी राज्यात अशीच स्थिती कायम राहणार आहे. हवामान विभागानं दिलेल्या माहितीनुसार मान्सून ट्रफ आपल्या सामान्य स्थानापेक्षा अधिक उत्तरेकडे सरकरल्यानं मध्य भारत आणि महाराष्ट्रात पावसाचा जोर ओसरला आहे. त्यामुळे महाराष्ट्रात पावसाचं प्रमाण कमी होऊ शकतं, तर दुसरीकडे दक्षिण भारतात मात्र जोरदार पावसाची शक्यता आहे.

यंदा मान्सून देशासह राज्यात वेळेपूर्वीच दाखल झाला, सामान्यपणे मान्सून महाराष्ट्रात सात जून रोजी दाखल होतो, मात्र मान्सून २५ मे रोजीच राज्यात दाखल झाला होता. यावर्षी राज्यात आतापर्यंत चांगला पाऊस झाला आहे, मात्र पावसाचं हे प्रमाण असमान आहे. विदर्भ आणि कोकणात जोरदार पाऊस झाला, मात्र मराठवाड्याला अजूनही चांगल्या पावसाची प्रतिक्षा आहे. मराठवाड्यातील अनेक जिल्ह्यात अति अल्प पाऊस झाला आहे. चांगला पाऊस झाला नसल्यामुळे पिके संकटात सापडली आहेत, आता आणखी एक शेतकऱ्यांच्या चिंतेत भर पडण्याची शक्यता आहे.

याबाबत बोलताना आयएमडीच्या वरिष्ठ अधिकाऱ्याने सांगितलं की, मान्सून ट्रफ उत्तरेकडे सरकण्याचं एक महत्त्वाचं कारण म्हणजे सध्या ते हिमालयाच्या पायथ्याशी सक्रिय आहेत, त्यामुळे सध्या उत्तरेकडील मैदानी प्रदेशात आणि पूर्वोत्तर राज्यात चांगला पाऊस पडत आहे. मात्र दुसरीकडे मध्य प्रदेश, कर्नाटक आणि महाराष्ट्रात मान्सून ठप्प झाला आहे. सहा ऑगस्टनंतर दक्षिण भारतात पुन्हा एकदा पाऊस सक्रिय होऊ शकतो, असे ते म्हणाले.

# छत्रपती शिवाजी महाराज पुतळा ते महात्मा गांधी पुतळा रस्ता एकेरी मार्ग

**नांदेड (प्रतिनिधी)–** नांदेड शहरातील महात्मा गांधी पुतळा ते छत्रपती शिवाजी महाराज पुतळा हा रस्ता दुहेरी मार्ग असून या रस्त्याचे काम होईपर्यंत हा मार्ग एकेरी वाहतुकीसाठी चालु राहणार आहे. महात्मा गांधी पुतळा ते शिवाजी महाराज पुतळा मार्ग वाहतुकीस प्रतिबंध करण्यात आला आहे. या मार्गावरील वाहतुकीस पर्यायी मार्ग म्हणून महात्मा गांधी पुतळा ते सोनु कार्नर, मुथा चौक ते शिवाजी महाराज पुतळा असा राहील.

मोटार वाहन कायदा १९९९ चे कलम ११५ मधील तरतुदीनुसार जिल्हादंडाधिकारी राहुल कर्डिले यांनी संबंधीत विभागांना उपाय योजना करुन ५ ते ३० ऑगस्ट २०२५ या कालावधीत अधिसुचनेत नमुद केलेल्या पर्यायी मार्गाने सर्व प्रकारची वाहने वळविण्यास मान्यता दिली आहे.

पोलीस अधीक्षक नांदेड यांनी कायदा व सुव्यस्थेच्या अनुषंगाने आवश्यक त्या उपाय योजना करावी. कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग नांदेड यांनी रस्ता वाहतुक प्रतिबंध व पर्यायी रस्त्यासाठी आवश्यक असलेले बोर्ड, चिन्ह लावणे इत्यादी बाबतची कार्यवाही करावी, असेही अधिसुचनेत स्पष्ट केले आहे.

# माजी राज्यपाल सत्यपाल मलिक यांचं निधन

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** जम्मू काश्मीरचे माजी राज्यपाल सत्यपाल मलिक यांचे निधन झाले आहे. दिल्लीतील आरएम रुग्णालयात त्यांनी अखेरचा श्वास घेतला. गेल्या काही दिवसांपासून त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू होते, अखेर त्यांची प्राणज्योत मालवली, ते ७९ वर्षांचे होते. गोवा, मेघालय, ओडिशा आणि जम्मू काश्मीरचे राज्यपाल म्हणून त्यांनी आपली कार्यभार सांभाळला. तत्पूर्वी आमदार ते राज्यपाल असा त्यांचा राजकीय प्रवास राहिला आहे. त्यांच्या निधनाने राजकीय वर्तुळातून शोक व्यक्त होत आहे. तसेच, दिग्गजांकडून त्यांना श्रद्धांजली वाहिली जात आहे.



सत्यपाल मलिक यांचा प्रवास सपामधून सुरु झाला होता, ते काही काळ भाजपमध्येही कार्यरत होते. मात्र, अनेकदा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर थेट टीका केल्याने त्यांच्याकडे देशभरातील राजकीय नेत्यांचे लक्ष लागले होते.

# हदगाव येथील व्यापाऱ्याच्या प्रतिष्ठानावर जीएसटी अधिकाऱ्यांचा छापा

**हदगाव (प्रतिनिधी)–** येथील बहुप्रतिष्ठित एका सिमेंट गजाळीच्या मोठ्या दुकानावर हदगाव येथील जीएसटी विभागाचे अधिकाऱ्यांनी छापा टाकला. शहरातील पत्रकारांनी याबाबतीत त्या अधिकाऱ्यांची भेट घेण्याचा प्रयत्न केला असता त्यांनी सर्वांची भेट टाळली.

हदगाव शहरातील बसस्थानकापासून नांदेडकडे जाणाऱ्या रोडवर असलेल्या एका बांधकाम साहित्य विक्रीच्या व्यापारी प्रतिष्ठानावर नांदेड येथील जीएसटी कार्यालयाच्या अधिकाऱ्यांनी मंगळवारी छापा मारून हे प्रतिष्ठान तपासणी करण्यासाठी ताब्यात घेतल्या




प्रमाणे अधिकारी या दुकानात थांबले. मंगळवारी दुपारी बारा वाजल्यापासून बाहेर पथकाची गाडी थांबल्यामुळे ग्राहक सुद्धा येणे बंद झाले. तेथील सर्व कर्मचाऱ्यांचे आणि काम करणाऱ्या लोकांचे मोबाईल त्यांनी ताब्यात घेतल्याचे तेथील एका प्रत्यक्षदर्शीनी सांगितले.

शहरात जीएसटीचे पथक आल्याचे समजताच आणखी काही व्यापाऱ्यांनी आपली प्रतिष्ठान बंद ठेवली. हदगाव शहरात याबाबतीत मोठी चर्चा होती. हे पथक व्यापाऱ्यावर दबाव आणून तडजोड करण्यासाठी प्रयत्न करत असल्याची व्यापाऱ्यांमध्ये चर्चा पसरली.

दुकानासोबतच व्यापाऱ्याच्या घराची व इतर ठिकाणांची सुद्धा झडती घेणार असल्याचे तसेच बँक खाते आणि सर्व खरेदी विक्रीचे व्यवहार तपासणार असल्याचे चर्चेतून समोर आले आहे. नेमके हे पथक कशाची तपासणी करणार व कोणते कोणते प्रतिष्ठान तपासणार हे उद्या अधिकारी प्रसिद्धी माध्यमांना सांगतील अशी अशा व्यक्त केली जात आहे.

# उत्तरांखडमध्ये विध्वसंक ढगफुटी

## जवानांसह ५० पेक्षा जास्त नागरिक गायब

**उत्तरकाशी (प्रतिनिधी)–** उत्तरांखड राज्यातील उत्तरकाशी येथे मंगळवारी दुपारी मोठी दुर्घटना घडली. येथे भारतीय लष्कराच्या तळापासून साधारण ४ किमी दूर असणाऱ्या धराली गावात ढगफुटी झाली आहे. या ढगफुटीमुळे धराली गावात मोठा विध्वंस झाला आहे. घडफुटी झाल्यानंतर त्या भागात मोठा पूर आला असून तब्बल ४ लोकांचा मृत्यू झाला आहे. या दुर्घटनेत ५० पेक्षा जास्त लोक गायब झाले आहेत. या दुर्घटनेचे अनेक व्हिडीओ समोर आले आहेत. दुर्घटनेची माहिती होताच या भागात युद्धपातळीवर बचावकार्य चालू आहे.

या ढगफुटीमुळे पवित्र गंगोत्री धामचा रस्तादेखील वाहून गेला आहे. अचानक आलेल्या ढगफुटीमुळे चिखल आणि पाण्याचा फार मोठा पूर आला आहे. या पुरात धराली परिसर जलमग्न झाला आहे. ही दुर्घटना घडताच आपत्कालीन मदत पाठवण्यात आली असून तिथे युद्धपातळीवर बचावकार्य केले जात आहे.

उत्तरकाशीचे जिल्हाधिकारी प्रशांत आर्य यांनी या घटनेची सविस्तर माहिती दिली आहे. या दुर्घटनेत आतापर्यंत पाच लोकांचा मृत्यू झाल्याचे त्यांनी सांगितले आहे. या दुर्घटनेत आणखी किती लोकांचा मृत्यू झाला तसेच वित्तहानी किती झाली? हे आगामी काळात समजेल, असे प्रशांत आर्य यांनी सांगितले. दुसरीकडे ही दुर्घटना होताच मुख्यमंत्री पुष्कर सिंह धामी यांनी धरालीतील दुर्घटनेनंतर दु:ख व्यक्त केलं.

धाराली गाव गंगोत्र धामच्या साधारण २० किमी अलिकडे आहे. भाविकांना थांबण्यासाठी हे एक महत्त्वाचे ठिकाण आहे. ही घटना घडल्यानंतर प्रत्यक्षदर्शी राजेश पवार यांनी सविस्तर माहिती दिली आहे. खीर गंगाच्या परिसरात ढगफुटी झाली आहे. त्यामुळे नदीत विध्वसंक पूर आला. या पुरात पाणी आणि चिखल मोठ्या प्रमाणात होता. यात अनेक घरं, हॉटेल वाहून गेले. विशेष म्हणजे हा पूर आल्याचे पाहून लोक सैरावेरा पळत सुटले होते. यात काही लोक वाहून गेले.

# आता मराठा आरक्षण मिळवल्याशिवाय फेटा बांधणार नाही –मनोज जरांगे पाटील

**मुंबई (प्रतिनिधी)–** मराठा आरक्षण लढ्यातील विजय मिळवल्याशिवाय आपण फेटा बांधणार नाही अशी शपथ जणू मराठा आरक्षण आंदोलक नेते मनोज जरांगे पाटील यांनी घेतली आहे.



मराठा आरक्षणासाठी मनोज जरांगे यांनी २९ ऑगस्टला मुंबईला धडक देण्याची तयारी सुरु केली आहे. या आंदोलनात आता माघार घेतली जाणार नाही अशी भूमिका त्यांनी घेतली होती. आता आपण मराठा आरक्षण मिळवूनच स्वस्थ बसणार असल्याचे मनोज जरांगे पाटील यांनी म्हटले आहे.

मराठा आरक्षण आंदोलक नेते मनोज जरांगे पाटील यांनी मुंबईला धडक देणार असल्याचे म्हटले आहे. आज धाराशिव येथे शिवसेना उद्धव ठाकरे पक्षाचे आमदार प्रवीण स्वामी यांच्याकडून फेटा बांधण्याचा आग्रह करण्यात आला. त्यावेळी आता मराठा आरक्षणाचा लढा यशस्वी झाल्यावरच फेटा खालू असे म्हणत त्यांनी फेटा बांधण्यास नकार दिला आहे. २९ ऑगस्ट रोजी होणाऱ्या मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनात शिवसेना उद्धव ठाकरे पक्षाचे आमदार सक्रिय सहभाग घेणार आहेत.

मनोज जरांगे पाटील यांचा धाराशिवमध्ये दौरा आणि गाठीभेटी घेणे सुरु आहे. यावेळी त्यांच्या मराठा आरक्षण लढ्याच आपण सक्रीय सहभाग घेणार असल्याचे आमदार प्रवीण स्वामी यांनी सांगितलं. संपूर्ण महाविकास आघाडी आरक्षण आंदोलनात सक्रिय सहभागी असेल असेही उद्धव ठाकरे गटाचे आमदार प्रवीण स्वामी यांनी म्हटले आहे.







# उत्तराखंड येथे गेलेले नांदेड जिल्ह्यातील सर्व यात्रेकरू सुखरुप

**नांदेड (प्रतिनिधी)–** उत्तराखंडमध्ये मुसळधार पावसामुळे दि. ५ ऑगस्ट रोजी परिस्थिती गंभीर आहे. उत्तरकाशी जिल्ह्यातील धराली येथे ढगफुटी झाली असून ज्यामुळे खीरगंगा नदीला मोठा पूर आला आहे. अनेक घरांचे नुकसान झाले आहे आणि काही ठिकाणी भूस्खलन देखील झाले आहे. उत्तराखंडमध्ये अतिवृष्टी झाली आहे. अनेक ठिकाणी ढगफुटीच्या घटना घडल्या आहेत. ज्यामुळे भूस्खलन आणि पूर आले आहेत. नांदेड जिल्ह्यातून बिलोली तालुक्यातील मौ. डोणगाव येथील ११ जण केदारनाथ बद्रीनाथ यात्रेसाठी १ ऑगस्ट रोजी नांदेड येथून निघाले होते, त्यांचा संपर्क झाला आहे. ते सर्व सद्यस्थितीत घटनास्थळापासून १५० किमी दूर असून सर्व ११ जण सुखरूप असल्याचे जिल्हा आपत्कालीन कार्य केंद्रास सचिन पत्तेवार यांनी कळविले आहे.

त्या अकरा जणांची नावे पुढील प्रमाणे आहेत. सचिन पत्तेवार वय २५, शिवचंद्र सुकाळे वय ३०, शिवा कुरे वय ३२, स्वप्निल पत्तेवार वय २५, शिवा ढोबळे वय २८, धनंजय ढोबळे वय २६, नागनाथ मुंके वय २८, देवानंद गौण्डगे वय २४, अमोल कुरे वय २८, सोमनाथ चंदापुरे वय २९, देवानंद चंदापुरे वय २७.

उत्तरकाशी येथे घडलेल्या परिस्थितीवर नांदेड जिल्ह्याचे पालकमंत्री अतुल सावे हे लक्ष ठेवून असून आवश्यकते नुसार कार्यवाही करण्याच्या सूचना त्यांनी जिल्हाधिकारी यांना केल्या आहेत. नांदेड जिल्ह्यातील अजून कुणी उत्तराखंड येथे अडकून पडले असेल तर त्यांच्या नातेवाईकांनी संबंधित तालुक्यातील तहसीलदार यांच्याकडे किंवा जिल्हा आपत्कालीन कार्य केंद्र जिल्हाधिकारी कार्यालय नांदेड येथे (०२४६२) २३५०७७ या क्रमांकावर संपर्क करावा असे आवाहन जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी केले आहे.

जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांसी सांगावे
शहाणे करूनी सोडावे, सकळ जन

संस्थापक संपादकः
कै. देविदासराव रसाळ

गोदातीर समाचार

संपादक
केशव घोणसे पाटील

# तरुणांना सोशल मीडियापासून कोण वाचवेल?

सोशल मीडियाचे जग आपल्या रोजच्या जीवनाचा अविभाज्य भाग झाले आहे. मोबाईलवरील सोशल मीडिया न वापरणारा मनुष्य आज अडाणी, मूर्ख आणि कालबाह्य ठरतो आहे. याची सुरुवात सुमारे २५ वर्षांपूर्वी झाली. तेव्हा जन्मतःच मुलांना मोबाईल देण्याची सवय पालकांनाही लागली. म्हणून आता १९९७ ते २०१० दरम्यान जन्मलेली पिढी ही त्याचा सर्वाधिक परिणाम अनुभवणारी पहिली पिढी ठरते आहे. युरोपियन आयोगाने नुकताच प्रसिद्ध केलेला एक अहवाल, या पिढीच्या मानसिक आरोग्याबाबत गंभीर इशारा देतो. सोशल मीडियामुळे तणाव, मानसिक थकवा, चिंता आणि सतत मोबाईलमध्ये गुंतून राहण्याचे वर्तन या पिढीत वाढत असल्याचे या अभ्यासातून स्पष्ट झाले आहे. ही पिढी डिजिटल युगात जन्मली आणि वाढली. इंटरनेट, स्मार्टफोन आणि सोशल मीडियाच्या छायेतच त्यांचे बालपण गेले. त्यामुळेच तंत्रज्ञानाशी प्रचंड सुसंगत असलेल्या या तरुणांनी स्वतःची मूल्यव्यवस्था, जगण्याची शैली आणि विचार पद्धती वेगळी घडवली. मात्र, याच तंत्रज्ञानाने त्यांना मानसिकदृष्ट्या कमकुवतही केले आहे, हे युरोपियन आयोग आणि २०२४ च्या वर्ल्ड हॅपिनेस रिपोर्टमधून अधोरेखित होते. हा मानसिक तणाव अभ्यासाच्या ताणामुळे नाही, तर सोशल मीडियावरील अतिअवलंब झाल्यामुळे होत असल्याचे स्पष्ट झाले आहे. सोशल मीडियावरील इतरांच्या तुलनेत आपण आपल्या आयुष्यात मागे पडतोय अशी सततची भावना, हेही त्याचे एक महत्त्वाचे कारण ठरते. सतत परिपूर्णतेचा आभास निर्माण करणाऱ्या पोस्ट्स, 'लाइक्स' व 'फॉलोअर्स'च्या मागे लागलेली ही पिढी नकळत एक खोट्या स्पर्धेत गुरफटली आहे. कोरोना महामारीच्या काळात या पिढीवर इंटरनेट आणि डिजिटल माध्यमांवर अधिकच अवलंबून राहण्याची वेळ आली. शिक्षण, करिअर, नोकरीपासून ते सामाजिक संवादापर्यंत सगळे काही ऑनलाईन झाल्याने त्यांचे खरे जीवन अधिकच एकटे, विस्कळीत आणि तणावपूर्ण बनले. परिणामी, सोशल मीडिया हे करमणुकीचे साधन राहून गेले नाही, तर मानसिक थकव्याचे मुख्य कारण बनले. यात भर म्हणून, ही पिढी जागतिक अस्थिरता, युद्धजन्य परिस्थिती, हवामान बदल, बेरोजगारी, सांस्कृतिक गोंधळ, राजकीय कट्टरता अशा अनेक नकारात्मक प्रवृत्तींशी रोज सामना करत आहे. मात्र, सोशल मीडियावरील चमकदार आणि काल्पनिक जगाशी तुलना करताना त्यांचे वास्तव अधिकच कठीण वाटते, आणि त्यामुळे त्यांच्यात न्यूनगंड, अस्वस्थता, आत्मविश्वासाचा अभाव दिसून येते. या साऱ्या समस्यांवर उपाय आहेत का? होय, पण त्यासाठी केवळ वैयक्तिक पातळीवरील प्रयत्न पुरेसे नाहीत. सरकार, शाळा, पालक, समाज आणि तज्ज्ञ मंडळी या सर्वांना एकत्रितपणे पुढे यावे लागेल. या बाबीचा सखोल विचार करून काही देशांनी सोशल मीडियावरील वयमर्यादा, वापराचे वेळापत्रक आणि ॲप्सचे नियमन यासाठी कठोर नियम लागू केले आहेत. भारतातही यासाठी ठोस उपाययोजना होणे अत्यावश्यक झाले आहे. सोशल मीडियाचा वापर पूर्णपणे थांबवण्यापेक्षा तो मर्यादित आणि उद्देशपूर्ण करणे महत्त्वाचे आहे. शिक्षण, आरोग्य, मानसिक संवाद यासाठी तंत्रज्ञानाचा वापर करण्याकडे झुकावे लागेल. घरामध्ये पालकांनी मुलांशी संवाद साधावा, त्यांच्या भावना जाणून घ्याव्यात, त्यांना ऐकून घ्यावे. दिवसातून काही वेळ मोबाईल बाजूला ठेवून कौटुंबिक संवादासाठी राखावा. अशा प्रत्यक्ष संवादानेच मुलांच्या मनावरचे ताण कमी होतील. शाळा आणि महाविद्यालयांमध्ये मानसिक आरोग्य, तणाव व्यवस्थापन, आत्मभान, भावनिक समज याविषयी प्रशिक्षण देणे अत्यंत गरजेचे आहे. इमोशनल इंटेलिजन्स म्हणजेच भावनिक बुद्धिमत्ता हा आजच्या काळातील सर्वांत मोठा कौशल्यगट ठरतो. विद्यार्थ्यांना हे शिकवण्यासाठी मानसोपचार तज्ज्ञ, समुपदेशक यांचे सत्रे नियमित घ्यावीत. चित्रपट आणि सोशल मीडियावर दाखविले जाणारे इतरांचे आयुष्य परिपूर्ण आणि देखणे वाटते, पण ते नेहमीच खरे नसते. त्यामुळे तरुणांनी स्वतःची ओळख, स्वतःचे सामर्थ्य आणि मर्यादा याची जाणीव ठेवणे आवश्यक आहे. त्यासाठी आत्मस्वीकृती, आत्मप्रेम आणि खरे अनुभवांचे महत्त्व पटवून देणारे मार्गदर्शन गरजेचे आहे. आजची पिढी ही केवळ तंत्रज्ञानप्रेमी पिढी नाही, तर नव्या विचारांची वाहकही आहे. तिच्या मानसिक आरोग्याची जबाबदारी आपल्या सर्वांची आहे. सोशल मीडियाचे भान राखत आणि वास्तवाशी नाते न तोडता या पिढीला समजून घेतल्यास, ती निश्चितच सशक्त आणि संवेदनशील समाजनिर्मिती करू शकेल.

# जुनी वाहने आणि प्रदूषण नियंत्रण: उपाय की अडचण?



दिल्लीसारख्या महानगरांमध्ये वायुप्रदूषण हा एक गंभीर आणि दीर्घकालीन प्रश्न ठरला आहे. स्वच्छ हवा ही केवळ गरज नाही, तर मूलभूत हक्क ठरावा इतक्या प्रमाणात हवामानातील विषारी बदलांची तीव्रता वाढलेली आहे. या संकटावर उपाय म्हणून सरकारने काही काळापूर्वी जुनी वाहने रस्त्यावरून हटवण्याचा निर्णय घेतला. मात्र, जनतेच्या विरोधामुळे तो निर्णय मागे घ्यावा लागला.

२०१५ मध्ये राष्ट्रीय हरित लवाद (छत्रद्ध) ने दिलेल्या आदेशानुसार, १५ वर्षांहून अधिक जुनी पेट्रोल वाहने आणि १० वर्षांहून अधिक जुनी डिझेल वाहने रस्त्यावरून हटवणे बंधनकारक करण्यात आले. यामागील हेतू स्पष्ट होता सर्वाधिक प्रदूषण करणारी जुनी वाहने रस्त्यावरून हटवून हवामानाच्या गुणवत्तेत सुधारणा साधणे. परंतु, या निर्णयामागील कल्पना कितपत वैज्ञानिक आणि दीर्घकालीन परिणाम लक्षात घेणारी आहे, हा खरा विचार करण्याचा मुद्दा आहे.

सर्वसाधारणपणे मानले जाते की जुनी वाहने अधिक प्रदूषण करतात. खरंतर, बीएस-१ (इड१) किंवा बीएस-२ (इड२) सारख्या जुन्या उत्सर्जन मानकांवर चालणारी वाहनं ही बीएस-६ (इड६) वाहनांच्या तुलनेत कणात्मक (झच्) आणि नायट्रोजन ऑक्साइड (छजु) यांसारख्या घटकांचे उत्सर्जन अनेक पटीने अधिक करतात. म्हणूनच वाहनाचे वय हे एक सुलभ आणि तात्पुरता निकष मानला जातो. परंतु, येथेच धोरणाची एकांगी बाजू दिसते केवळ वयानुसार वाहनांचे प्रदूषण मोजणे योग्य ठरते का?

दुसरा महत्त्वाचे निकष म्हणजे अंतर आणि उत्सर्जन. वाहन वयाव्यतिरिक्त आणखी दोन महत्त्वाचे निकष विचारात घ्यायला हवेत. एक म्हणजे वाहनाचे प्रत्यक्ष उत्सर्जन म्हणजे वाहन चालवताना प्रत्यक्षात किती प्रदूषण निर्माण होते. दुसरं म्हणजे एकूण चाललेले अंतर कारण अधिक चालवलेली वाहने अधिक घिसटत असतात आणि अधिक प्रदूषक घटक हवेमध्ये सोडतात.

नेदरलँड आणि जर्मनी यांसारख्या प्रगत देशांमध्ये हे दोन घटक महत्त्वाने गृहीत धरले जातात. अशा पद्धतीने वाहनाचे वय, उत्सर्जन आणि चाललेले अंतर या तीनही बाबींचा समन्वय साधला जातो, ज्यामुळे खऱ्या अर्थाने प्रदूषण करणारी वाहनेच हटवता येतात. भारतामध्ये वाहनांचे प्रदूषण प्रमाणपत्र (झणउ) मिळवणे बंधनकारक असले, तरी प्रत्यक्षात त्याची अंमलबजावणी अत्यंत कमकुवत आणि अपुरी आहे. अनेक ठिकाणी पीयूसी फक्त एक शिक्का पुरवणारी औपचारिकता बनून राहिली आहे. अशा परिस्थितीत, आपण जर प्रदूषण-आधारित धोरण राबवायचे ठरवले, तर त्यासाठी एक भक्कम आणि विश्वासार्ह उत्सर्जन परीक्षण प्रणाली उभी करणे अपरिहार्य ठरेल. जुनी वाहने हटवून नवीन गाड्या विकल्या जातात, त्यामागे एक आर्थिक गणित आहे. अमेरिका सारख्या देशांमध्ये एकेकाळी जुन्या वाहनांना स्क्रॅप करून नवीन गाडी खरेदीसाठी सबसिडी देण्यात आली होती. त्यामुळे बाजार तेजीत आला, उद्योगांना चालना मिळाली. पण एका सरासरी कारच्या निर्मितीत सुमारे १० टन कार्बन डायऑक्साइडचे उत्सर्जन होते. त्यासाठी स्टील, ॲल्युमिनियम, प्लास्टिक, दुर्मिळ धातू, रसायने अशा संसाधनांचा वापर होतो, जो संकुचित आणि अमूल्य नैसर्गिक संपत्तीचा नाश करतो. म्हणूनच जर एखादे जुने वाहन उत्सर्जन निकषांमध्ये बसत असेल, तर केवळ वयानुसार ते स्क्रॅपमध्ये टाकून नवीन वाहन घेणे म्हणजे पर्यावरणासाठी फायद्याऐवजी हानीकारक ठरू शकते.

यावर एक योग्य तोडगा म्हणजे, जुन्या वाहनांना नव्या उत्सर्जन मानकांप्रमाणे अपग्रेड करण्याची सुविधा देणे. म्हणजेच, इंजिन किंवा इंधन प्रणाली अद्ययावत करून ती वाहने पुन्हा उपयोगात आणता येतील. यामुळे संसाधनांची बचत, पर्यावरण रक्षण आणि जनतेचा आर्थिक भार कमी होऊ शकतो. सध्याच्या धोरणांचा कल जुने वाहन हटवा, नवीन खरेदी करा असा आहे जो पश्चिमी कार संस्कृतीचे अंधानुकरण वाटतो. ही कार संस्कृती अनेक देशांनी मागे टाकली आहे. नेदरलँड, डेन्मार्क, फ्रान्ससारखे देश आता सायकल, सार्वजनिक वाहतूक, आणि ई-मोबिलिटी याकडे वळले आहेत. आपण मात्र, वायू प्रदूषण वाढत असतानाही नवीन गाड्यांकडे धाव घेत आहोत. प्रश्न असा आहे हे खरेच पर्यावरणस्नेही धोरण आहे का?

दिल्लीसारख्या शहरात वायुप्रदूषणावर उपाय शोधताना, वाहनांच्या वयावर आधारित निर्णय ही केवळ एक सुरुवात असू शकते. मात्र, तेच अंतिम धोरण ठरवणे म्हणजे समस्या पूर्णपणे समजून न घेता उपाययोजना करणे ठरेल. त्यामुळे आपल्याला वैज्ञानिक आधार असलेले, न्याय्य आणि सर्वसमावेशक, संसाधनबचत करणारे, आणि सर्वसामान्य नागरिकांच्या जीवनशैलीला योग्य ठरणारे निर्णय हवे आहेत. प्रदूषण आणि निसर्ग यांच्यातील समतोल राखत हवामानाची गुणवत्ता टिकवणारे धोरण तयार करणे हे आपले अंतिम उद्दिष्ट असायला हवे केवळ 'जुनी वाहने हटवा' इतकेच नव्हे. शाश्वत विकासाचा विचार करत असताना, केवळ तात्कालिक फायदे नव्हे, तर भविष्यातील परिणाम आणि पर्यावरणावर होणारा दीर्घकालीन प्रभावही लक्षात घेणे गरजेचे आहे. अन्यथा, आपण जिथे प्रदूषण कमी करण्याच्या नावाखाली उपाय शोधतो, तिथेच नकळत नवीन संकटांची बीजे पेरली जातात.

**-मच्छिंद्र ऐनापुरे,**
जत जि.सांगली

# युवा खेळाडूंची जबरदस्त कामगिरी



इंग्लंड दौऱ्यावर असलेल्या भारतच्या युवा संघाने ५ कसोटी सामन्यांची मालिका २ - २ अशी बरोबरीत सोडवून इतिहास रचला. सोमवारी पाचव्या कसोटीच्या पाचव्या दिवसाचा खेळ सुरू झाला तेव्हा भारतीय संघ इंग्लंडचे उरलेले चार फलंदाज बाद करून ही कसोटी जिंकेल असा विचारही कोणी केला नसेल कारण इंग्लंडला जिंकायला फक्त ३६ धावा हव्या होत्या. इंग्लंडचे उरलेले फलंदाज या धावा सहज करतील आणि मालिका ३ - १ ने जिंकतील असाच सर्वांचा होरा होता. मात्र भारतीय खेळाडूंच्या मनात काहीही करून ही कसोटी जिंकायचीच आणि मालिका बरोबरीत सोडवायची असा विश्वास होता आणि या विश्वासाच्या जोरावरच भारताने ही कसोटी अवघ्या सहा धावांनी जिंकली आणि सर्वांना आश्चर्याचा धक्का दिला.

भारताचा हा विजय म्हणजे चमत्कारच म्हणावा लागेल अर्थात चमत्कार करण्याची देखील कला असावी लागते ही कला भारतीय खेळाडूंनी साध्य केली आणि साहेबांना त्यांच्या देशातच लोळविले. ही मालिका बरोबरीत सुटली असली तरी एकप्रकारे भारताचा हा विजयच आहे कारण भारतीय संघ जेव्हा ही मालिका खेळण्यासाठी इंग्लंडच्या भूमीवर उतरला तेव्हा त्यांच्या स्वागताला कोणी हजर नव्हते. सराव सत्रालाही गर्दी नव्हती, कारण सर्वांच्या मते इंग्लडच्या बलाढ्य आणि अनुभवी संघापुढे भारताचा युवा आणि अननुभवी संघ टिकणार नाही.

इंग्लडच्या अनेक दिग्गज माजी खेळाडू इंग्लड ही मालिका ४ - १ किंवा ५ - ० अशी जिंकेल असे छातीठोकपणे सांगत होते अर्थात त्याला कारणही तसेच होते रोहित शर्मा, विराट कोहली, रविचंद्रन अश्विन या भारताच्या माजी खेळाडूंनी निवृत्ती घेतली होती तर पुजारा, रहाणे, मोहम्मद शमी यासारख्या अनुभवी खेळाडूंना या मालिकेत वगळण्यात आले होते. बुमरा, के एल राहुल, जडेजा आणि पंत वगळता सर्वच खेळाडू नवखे होते. या मालिकेसाठी शुभमन गिल या युवा खेळाडूची निवड करण्यात आली होती.

बुमरा आणि पंत हे जरी अनुभवी असले तरी ते पूर्ण पाच कसोटी खेळणार नव्हते त्यामुळे ही मालिका इंग्लंड सहज जिंकेल असा कयास लावला जात होता मात्र भारताच्या युवा खेळाडूंनी जबरदस्त कामगिरी करून हा कयास फोल ठरवला. मालिकेच्या पहिल्या कसोटीतच भारताच्या खेळाडूंनी जबरदस्त कामगिरी करत इंग्लंडला इशारा दिला. वास्तविक पहिलीच कसोटी भारताने जिंकली असती पण मोक्याच्या क्षणी झेल सोडल्याने ही कसोटी इंग्लंडला जिंकता आली. दुसऱ्या कसोटीत मात्र भारताने पलटवार करत इंग्लडला तब्बल ३३६ धावांनी नामोहरण केले. तिसरी कसोटीही भारतानेच जिंकली असती मात्र नशीब बलवत्तर होते म्हणून इंग्लडला ही कसोटी अवघ्या २२ धावांनी जिंकता आली.

चौथ्या कसोटीत मात्र दोन्ही संघाने तोडीस तोड कामगिरी केल्याने ती कसोटी अनिर्णित राहिली. पाचव्या कसोटीत पुन्हा भारताने जबरदस्त कामगिरी करत विजय मिळवला आणि मालिका बरोबरीत सोडवली. ज्या संघाचा मानहानीकारक पराभव होईल असा अंदाज होता त्याच संघाने मालिका बरोबरीत सोडवत इतिहास घडवला. भारतीय संघाच्या या ऐतिहासिक यशाचे जितके कौतुक करावे तितके कमी आहे. भारताच्या युवा खेळाडूंकडे अनुभवाची कमतरता असली जिंकण्याचा विश्वास होता याच विश्वासाच्या बळावर भारताच्या या युवा संघाने ही कामगिरी केली. भारताच्या युवा खेळाडूंनी फलंदाजी, गोलंदाजी आणि क्षेत्ररक्षण या तिन्ही आघाडीवर नेत्रदिपक कामगिरी केली. कर्णधार शुभमन गिल, के एल राहुल, यशस्वी जयस्वाल, ऋषभ पंत या खेळाडूंनी संपूर्ण मालिकेत धडाकेबाज फलंदाजी करून इंग्लंडची गोलंदाजी नेस्तनाबूत केली. कर्णधार शुभमन गिलने संपूर्ण मालिकेत सर्वाधिक ७५४ धावा काढून विक्रमी कामगिरी केली. तर के एल राहुलने ५३२ धावा काढल्या. ऋषभ पंत आणि यशस्वी जयस्वाल यांनी ४०० पेक्षा अधिक धावा काढल्या. भारताच्या या युवा फलंदाजांची ही कामगिरी हेवा वाटावी अशीच आहे. या खेळाडूंनी खोऱ्याने धावा काढल्याने मालिका बरोबरीत सोडवण्यास मोठी मदत झाली.

गोलंदाजीतही भारतीय गोलंदाजांनी कमाल केली. बुमरा, सिराज आणि प्रसिद्ध कृष्णा, आकाश दीप या वेगवान गोलंदाजांनी कमाल करत इंग्लडच्या फलंदाजांचे कंबरडे मोडले. मोहम्मद सिराजने मालिकेत सर्वाधिक २३ बळी घेतले. बुमरा आणि प्रसिद्ध कृष्णा या तिघांनी ३ कसोटी खेळले आणि त्यांनी प्रत्येकी १४ बळी घेतले. तर आकाशदीपनेही ३ कसोटीत १३ बळी घेतले शिवाय शेवटच्या कसोटीत नाईट वाचमन म्हणून मोक्याच्या क्षणी अर्धशतक झळकावले. मोहम्मद सिराजने तर या मालिकेत अप्रतिम कामगिरी केली. रवींद्र जडेजाने या मालिकेत अष्टपैलू खेळ केला. रवींद्र जडेजाने या मालिकेत ५०० पेक्षा जास्त धावा काढल्या आणि मोक्याच्या क्षणी ७ बळी घेतले. एकूणच भारताच्या खेळाडूंनी फलंदाजी आणि गोलंदाजीत अप्रतिम कामगिरी केली. भारताचा नवा कर्णधार शुभमन गिलने संघाचे नेतृत्व कुशलतेने केले.

कर्णधार म्हणून पहिलीच मालिका खेळत असतानाही तो कुठेही गांगरलेला वाटला नाही उलट मोक्याच्या क्षणी डोके शांत ठेवून व्यूहरचना रचत त्याने आपल्यातील नेतृत्वगुण दाखवून दिले. कर्णधारपदावर झालेली आपली निवड सार्थ ठरवत त्याने ही मालिका बरोबरीत सोडवली. कर्णधार असूनही त्याने आपल्या फलंदाजीवर परिणाम होऊ दिला नाही उलट कर्णधार झाल्यावर त्याची बॅट आणखी तळपली. त्याने या मालिकेत सर्वाधिक ७५४ धावा काढून कर्णधार म्हणून एका मालिकेत सर्वाधिक धावा काढण्याचा विक्रम केला. त्याने या मालिकेत ४ शतके झळकावली. तोच या मालिकेचा मालिकावीर ठरला एकूणच भारताच्या या युवा खेळाडूंनी जबरदस्त कामगिरी करून ही मालिका बरोबरीत सोडवली. भारताच्या या नव्या युवा संघाची ही कामगिरी कौतुकास्पदच नाही तर अभिमानास्पद आहे. इंग्लड विरुद्धची कसोटी मालिका बरोबरीत सोडवणाऱ्या भारतीय संघाचे मनापासून अभिनंदन! चक दे इंडिया!!

**-श्याम ठाणेदार**
दौंड, जि. पुणे
मो. ९९२२५४६२९५

# सणांचा-व्रत वैकल्याचा महिना श्रावण



काल पासून म्हणजे सोमवारपासून श्रावण महिना सुरू झाला. हिंदू धर्मात श्रावण महिन्याचे महत्व अनन्यसाधारण असे आहे. श्रावण महिन्यातील सोमवार हिंदू धर्मात पवित्र मानला जातो. या दिवशी महादेवाची पूजा केली जाते. तसे श्रावण महिन्यातील प्रत्येक वारी कोणत्या ना कोणत्या देवतेची पूजा व व्रत करण्याची हिंदू व जैन धर्माची परंपरा आहे.

श्रावण महिन्याला सणांचा महिना म्हंटले जाते. कारण श्रावण महिन्यातच सर्वात जास्त सण येतात. या महिन्यात व्रत वैकल्याची रेलचेल असते. श्रावण महिन्यात नाग पंचमी, रक्षा बंधन, नारळी पौर्णिमा, श्रीकृष्ण जन्माष्टमी, गोपाळकाला, मंगळागौर, बैल पोळा हे सण येतात. त्यानंतर येणारे गौरी गणपतीही याच महिन्यात खुणावत असतात. नाग पंचमी पासून दसरा दिवाळी पर्यंत सगळ्या हव्या हव्याशा सणांची सुरुवात याच महिन्यापासून होते. सणांच्या दिवशी गोडाधोडाचा बेत घराघरांत असतो. श्रावणातील प्रत्येक दिवस सण होऊन जातो. अशा आनंदी वातावणामुळे असेल कदाचित पण श्रावणात मनाच्या सांदी कोपऱ्यात उत्साहाचे नवे ऋतू फुलत असतात. बहुतेक सगळ्या सणामध्ये आणि अंगिकारल्या जाणाऱ्या व्रत वैकल्यांमधून संकटातून निर्भिडपणे आणि यशस्वीपणे बाहेर येण्यासाठी शक्ती मिळवण्यासाठी प्रेरणा मिळते.

संसारातील सर्व सुख दुःखाचा सारीपाट मांडला असताना मन मोकळं करून सख्याना समजून घेण्याचे हक्काचे क्षण हा महिना देऊन जातो. श्रावण महिना केवळ हिंदुंसाठीच नव्हे तर मुस्लीम आणि पारशी बांधवांसाठी ही पवित्र महिना मानला जातो कारण याच महिन्यात मुस्लिमांची बकरी ईद आणि पारशी बांधवांची पतेती हे सण येतात. त्यामुळे हिंदू प्रमाणेच जैन, मुस्लिम आणि पारशी बांधव श्रावण महिन्याची आतुरतेने वाट पाहत असतात. मुस्लिम आणि पारशी बांधव देखील त्यांचे सण उत्साहात आणि जल्लोषात साजरे करतात. श्रावण महिन्यात निसर्गाला उधाण आलेले असते. आषाढ महिन्यात झालेला पावसाने सर्वत्र हिरवळ दाटलेली असते. निसर्ग आषाढ सरी पिऊन हिरवे गालिचे पसरून बहरलेला असतो. हा हिरवा गालिचा पाहूनच

हिरवे हिरवेगार गालिचे
हरित तृणाच्या मखमालीवर...

ही कविता बालकवींना सुचली असावी. श्रावण महिन्यात सगळीकडे वसुंधरेवर श्रावणाच्या धारा बरसत असतात. श्रावणाच्या धारा बरसत असल्याने निसर्ग सौंदर्य तृप्तीचा हुंकार देत असतो. निसर्गाचे बहरलेले सौंदर्य पाहताच हासरा, नाचरा, लाजरा, सुंदर साजिरा श्रावण आला या ओळी ओठी गुणगुणावश्या वाटतात. श्रावण म्हणजे चैतन्य... श्रावण म्हणजे उत्साह...

श्रावण मासी हर्ष मानसी
हिरवळ दाटे चोहिकडे
क्षणात येते सरसर शिरवे
क्षणात फिरून उन पडे

या कवितेत बालकवींनी श्रावण महिन्याचे चित्रण यथार्थपणे मांडले आहे.

**-श्याम ठाणेदार**
दौंड, जि. पुणे
मो. ९९२२५४६२९५

# मित्र वणव्यामध्ये गारव्यासारखा...

तू एक आस
मनातला ध्यास
जिथे उभा मी
तिथे तू श्वास

सबंध आयुष्यात आपण अनेक नाते निर्माण करतो. काही जन्मल्याबरोबर लगेच आपोआप लागतात, तर काही जगताना वाढत जातात, तर काही आपल्याकडून जाणीवपूर्वक वाढवली जातात. त्यातलचे एक नाते म्हणजे मित्राचे- मैत्रीचे! लहान असो की वयोवृध्द प्रत्येकाला एमैत्रीची व्याख्या खरी एक आहे आणि खोटी एक. सुरुवातीला खरी सांगतो. 'मित्र म्हणजे असा सोबती जो मार्गदर्शक असून मित्राचे नेहमी चांगले चिंतन करतो.' आणि एक खोटी - 'मित्र म्हणजे असा सोबती जो गरजेपुरता सोबत असतो.'

मुळात या दोन्ही व्याख्या का कराव्या लागल्यात? कारण दुसरी व्याख्या सध्या खरी होवू पाहत आहे आणि पहिली व्याख्या ही पहिली आहे यातच खूष आहे. जो पहिला नंबर काठावर पास होवून पहिला असण्यात समाधानी आहे. 'आस' नावाच्या शब्दाची जागा 'फास'ने घेतली आहे. शोधण्यासाठी म्हणून नाही तर जे सापडले ते आपल्यापुढे मांडायचे म्हणून. सध्याचे मैत्रीचे नातेच मुळात व्यावसायिक झाली आहे. फायदा तिथे मैत्री झाली आहे. जिथे फायदा नाही तिथे मैत्रीपण नाही. जीवाला जीव देणारे दोस्त आता कुठेच सापडत नाहीत. कारण तितके मरण्यापर्यंत जाण्याची कोणात धमक उरलेली नाही.

मित्र म्हणजे मदतीला धावून येणारा असेही आपण येतो. पण नेहमी आपणच मित्र व्हायचे सगळी जवळची माणसे, कामे सोडून त्याचे काम करायला पळत सुटायचे आणि त्याची वेळ आली की असेच काहीतरी महत्वाचे काम आले म्हणून त्याने स्तब्ध बसायचे, हे स्वार्थी नाही म्हटले तरी त्याच्यासाठी 'हो' आणि आपण का 'हो' होवू नाही. मित्र म्हणजे आतला पाझर म्हणे, पण तोही आता आटत चाललाय. आणि हे आटणे इतके भयंकर आहे की काळीजही केवळ हदय म्हणूनच धडकत आहे.

मित्राची सोबत असतानाची निंदानालस्ती समजू शकू, मित्राचे कदाचित ते वाट दाखवणे असू शकेल. पण माघाऱ्याची वाजवावाजवी केवळ भित्रे 'शत्रूत्वच' आहे.

व्यसनी मित्र असू शकतो पण व्यसनी करणारा नाही. त्याचे नुकसान झाले म्हणून आपलेही करावे तो मित्र कसला. तुम्ही हजार गोष्टी त्याच्याबद्दल चांगल्या सांगता पण तो एक चांगला शब्द आपल्यासाठी उच्चारत नसेल तर त्याच्यापासून दूरच राहा. माहिती लपवणारा, तुम्हालाच खोटेनाटे सांगणारा मित्र कसा असेल बरं! माघारी वाजवणारा तरी भित्रा शत्रू असेल पण पुढून विनाकारण चूक काढणारा तर खुला-खुला मित्राच्या वेशातला शत्रुची की! मित्र सुख-दुःख वाटून घेतो पण आपलेच सुख बरे न दिसणारा असेल तर हा आव्हानाच्या मार्गातला जबरदस्ती आव्हानच की!

शंभर कोरडे असण्यापेक्षा दोन चार मोकळे कधीही कामाचे. चार स्तंभातला एकही भरोशाचा नसेल तर मोडकाच पण एक विश्वासाचा असावा, जो जिंकण्याचे बळ देईल तोच मित्र सदैव आपल्या ताईत ठेवावा.

मित वणाव्यामध्ये गारवा देणारा असेल तर तुम्हीही कधीतर गारवा दिलेला असावा लागतो. दुसऱ्याकडून अपेक्षा ठेवताना स्वतः रिकामे राहणे हे कुठल्याच व्याख्येत बसणारे नाही. स्वतः ला ओळखायला जिंदगी संपते पण लोकांना ओळखायला एक क्षण पुरेसा असतो. फेसबुकवर अनोळखी चेहऱ्यांचे लोकं मित्र करताना ओळखीचे आधी ओळखा. नाहीतर गराडा करण्याच्या नादात कधी चुराडा झाला हेच कळायचे नाही.

त्यामुळे सोबत राहणे व नुसतेच गरजेपुरते एकमेकांना झेलने म्हणजे मैत्री नसते. जिथे ओलावा नसतो मुळात तिथे पाझर नसतो; आणि जिथे सगळेच आटलेले आहे तिथे जबरदस्ती मित्र शोधायचा नसतो.

तुझा चेहरा तर
माझ्यागतच आहे
मन इतके कलुषित
असेल तर,
शत्रू काय वाईट आहे...

**-अमोल चंद्रशेखर भारती,**
नांदेड
मो. ८८०६७२१२०६

## थोडक्यात...

### जिल्हास्तरीय बॅडमिंटन स्पर्धेचे आयोजन

**नांदेड (प्रतिनिधी)–** नांदेड शहर व जिल्हा बॅडमिंटन संघटनेतर्फे दि. ९ व १० ऑगस्ट रोजी जिल्हास्तरीय बॅडमिंटन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

ही स्पर्धा ११ वर्षांखालील मुले व मुली एकेरी १३, १५, १७, व १९ वर्षांखालील मुले व मुली एकेरी व दुहेरी या वयोगटांमध्ये तसेच महिला व पुरुष एकेरी व दुहेरी गटामध्ये स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. इच्छुक खेळाडूंनी आपली नावे दि. ८ ऑगस्ट २०२५ पर्यंत जिल्हा क्रीडा संकुल बॅडमिंटन हॉल येथे सायंकाळी ४ ते ८ या दरम्यान आपली नावे नोंदवावीत. अधिक माहितीसाठी सचिव महेश वाकरडकर यांच्याशी ९९६०० ५२३४४ या क्रमांकावर संपर्क साधावा. जिल्ह्यातील जास्तीत जास्त खेळाडूंनी सहभाग नोंदवावा असे आवाहन संघटनेचे अध्यक्ष डी. पी. सावंत यांनी केले आहे.

### यशवंत महाविद्यालयात मोडी लिपी प्रशिक्षण वर्ग

**नांदेड (प्रतिनिधी)–** महाराष्ट्र शासनाच्या पुराभिलेख संचालनालय, मुंबई आणि यशवंत महाविद्यालय, नांदेडच्या पदवी, पदव्युत्तर इतिहास विभाग व संशोधन केंद्राच्या वतीने ऐतिहासिक मोडी लिपी कागदपत्रांचे वाचन व्हावे व त्याचा इतिहासाच्या विद्यार्थ्यांना उपयोग व्हावा; तसेच इतिहासप्रेमी व शासकीय कार्यालयातील कर्मचारी वर्ग यांना शासकीय कार्यालयातील कागदपत्रांचे वाचन करता यावे, यासाठी दि. १८ सप्टेंबर ते २७ सप्टेंबर २०२५ या कालावधीमध्ये मोडी लिपी प्रशिक्षण वर्ग आयोजित करण्यात येत आहे. या मोडी लिपी प्रशिक्षण वर्गात भाग घेऊ इच्छिणाऱ्या प्रशिक्षणार्थांकरिता प्रवेश अर्जासोबत दोन फोटो, महाविद्यालयीन ओळखपत्र किंवा आधारकार्ड आवश्यक आहे.

# आपली मुले ही पिढ्यान् पिढ्यांचे पीक
## मनपा शिक्षणाधिकारी व्यंकटेश चौधरी

**नांदेड (प्रतिनिधी)–** आपण सर्व शेतकरी कुटुंबातील माणसं आहोत, शेतातील वर्षभराच्या पिकाला आपण तळहाताच्या फोडासारखे जपतो. ती आपली समृद्धी असते, संपत्ती असते आणि आपली गरिबी हटविणारी लक्ष्मी असते या भावनेतून आपण हे सारे करतो. पण आपली मुले ही पिढ्यान् पिढ्यांचे पीक असते, असे प्रतिपादन मनपा नांदेड शिक्षणाधिकारी तथा शिक्षण विस्तार अधिकारी वाजेगाव बीट नांदेड व्यंकटेश चौधरी यांनी केले. ते वाजेगाव केंद्रांतर्गत असणाऱ्या नागापूर प्राथमिक शाळेमध्ये बोलत होते.



ते पुढे म्हणाले की, संतती हीच खरी संपत्ती या न्यायाने येणाऱ्या अनेक पिढ्यांचे दारिद्र्य हटवू शकणारी ती लक्ष्मी असते. आपली मुले सत्शील, कमावती आणि होतकरू निघण्याइतके समाधान कशातूनही मिळत नसते. हे शक्य करायचे असल्यास आपली मुले नित्य नेमाने शाळेत गेलीच पाहिजेत. त्यामुळे ग्रामीण भागातील पालकांनी आपल्या मुलांना नियमित शाळेत पाठवावे. एकही दिवस शाळेला गैरहजर राहणाऱ्या विद्यार्थ्यांचे खूप मोठे शैक्षणिक नुकसान होत असते, असे व्यंकटेश चौधरी म्हणाले.

आपला शेवटचा कार्यदिन गुणवत्तापूर्ण शाळेला भेट देऊन संस्मरणीय ठरविण्याच्या उद्देशाने त्यांनी प्राथमिक शाळा नागापूर येथे भेट दिली. याप्रसंगी त्यांनी शाळेतील सर्वच्या सर्व ८५ विद्यार्थ्यांना आणि तीनही शिक्षकांना दहा हजार रुपयांचे दर्जेदार पॅडचे वाटप केले. शाळेच्या ग्रंथालयात मौलिक भर घालणाऱ्या दहा हजार रुपयांच्या मनोरंजक, ज्ञानवर्धक पुस्तकांचा खजिना त्यांनी मुख्याध्यापक अक्षय ढोके यांच्या हाती सुपूर्द केला. यावेळी विद्यार्थ्यांना खाऊ, बिस्किटे, सोनपापडी चे वाटप करून त्यांचा दिवस गोड केला.

दरम्यान शिक्षणाधिकारी व्यंकटेश चौधरी यांचे गावात स्वागत फटाक्यांच्या आतिषबाजीत, ढोल ताशांच्या गजरात, पारंपरिक वेशभूषा करून आलेल्या विद्यार्थिनींच्या लेझिम पथकाद्वारे अगदी जल्लोषात करण्यात आले. स्वागतासाठी सारा गाव गावच्या वेशीपाशी चौधरी यांना घ्यायला येऊन उभा राहिला. यावेळी चौधरी यांच्या मार्गदर्शनामुळे जिल्हा परिषद प्राथमिक शाळा नागापूर मध्ये झालेल्या परिवर्तनाबद्दल कृतज्ञतापूर्वक आदरभाव व्यक्त करत असताना ग्रामपंचायत नागापूरच्या वतीने त्यांना त्यांच्या निस्पृह, प्रामाणिक सेवेसाठी ग्रामपंचायत नागापूरचा प्रथम आदर्श जनसेवक जीवनगौरव पुरस्कार सरपंच दिगंबर पाटील करडीले यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. यावेळी सिद्धांत चौधरी, गावातील सर्व ग्रामस्थ, माता पालक, पिता पालकांनी आपली भरगच्च उपस्थिती लावून कार्यक्रमाची शोभा वाढवली. याप्रसंगी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गोपाळ राजेबोईनवाड यांनी केले. तर आभार प्रदर्शन धम्मदीना सोनकांबळे यांनी केले.

# महसूल सप्ताहानिमित्त मोघाळी येथे छत्रपती शिवाजी महाराज समाधान शिबिर संपन्न

**भोकर (प्रतिनिधी)–** महाराष्ट्र शासन महसूल विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या महसूल सप्ताहानिमित्त नांदेड जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या आदेशान्वे उपविभागीय अधिकारी भोकर प्रवीण मेंगशेट्टी व तहसीलदार भोकर विनोद गुंडमवार यांच्या मार्गदर्शनाखाली मंडळ अधिकारी सतीश दंतुलवाड, ग्राम महसूल अधिकारी गौराजी कसेवाड यांनी शासनाच्या विविध योजनांची माहिती देण्यासह शेतकऱ्यांच्या समस्याचे निराकरण करण्यासाठी छत्रपती शिवाजी महाराज समाधान शिबिराचे आयोजन केले होते. महसूल सप्ताह दिनानिमित्त मोठ्या प्रमाणात वृक्ष लागवडही करण्यात आली.




महाराष्ट्र शासन महसूल विभाग मार्फत राबविण्यात येणाऱ्या महसूल सप्ताहानिमित्त तालुक्यातील मंडळ मोघाळी अंतर्गत गावांमध्ये दि. ३ ऑगस्ट रोजी हळदा, मोघाळी येथे पांदण रस्त्याच्या दुतर्फा मोठ्या प्रमाणात वृक्ष लागवड करण्यात आली. दि. ४ ऑगस्ट २०२५ रोजी छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान शिबिर राबविण्यात आले. यादरम्यान जिवंत सातबारा, शिधापत्रिका, विविध प्रमाणपत्र, किसान कार्ड, रहिवासी प्रमाणपत्र, वारसा फेर आधारे, उत्पन्नाचे प्रमाणपत्र नॉन क्रिमिनल आधी प्रमाणपत्र मान्यवरांच्या हस्ते वाटप करण्यात आले.

सदरील कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी गावचे सरपंच सतीश पवार तर प्रमुख पाहुणे माजी उपसभापती पंचायत समिती भोकर शंकर पाटील हे उपस्थित होते.

शिबिराच्या प्रास्ताविकतेमध्ये मंडळाधिकारी सतिश दंतुलवाड यांनी महसूल विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध योजना व कामांविषयी माहिती सांगितली व गावकऱ्यांनी विविध योजनांचा लाभ घ्यावा असे आवाहन यावेळी केले.

शिबिर यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी मंडळ अधिकारी सतीश दंतुलवाड, ग्राम महसुल अधिकारी गौराजी कसेवाड, कुलदीप हनवते, माधुरी गिरी, भाग्यश्री बखाल, पोलीस पाटील प्रतिनिधी अविनाश रजेपवाड, मारुती पुणेबोईनवाड, महसूल सेवक बालाजी दामनवाड, मुंडगे आदींसह अनेकांनी परिश्रम घेतले. तसेच दोन्ही गावचे आजी, माजी सरपंच, पोलीस पाटील, सेवा सहकारी सोसायटी चेअरमन, यासह गावातील नागरिक मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

यावेळी नव्याने रुजू झालेले मोघाळी सज्जाचे ग्राम महसूल अधिकारी गौराजी कसेवाड यांचा ग्रामपंचायत व ग्रामस्थांच्या वतीने सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मुनगे यांनी केले तर उपस्थितांचे आभार रास्त भाव दुकानदार पुणेबोईनवाड यांनी मानले.

# प्रतिभा निकेतन महाविद्यालयाच्या 'प्रतिभा लर्न' ऑनलाईन अभ्यासक्रम पोर्टलचे उद्घाटन




**नांदेड (प्रतिनिधी)–** विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी व ज्ञानाचा प्रसार विद्यार्थ्यांपर्यंत करण्याच्या उद्देशाने प्रतिभा निकेतन महाविद्यालयाने 'pratibhalearn.online' हे संकेतस्थळ सुरु केले आहे. या संकेतस्थळावर आधुनिक व स्पर्धात्मक जगात उपयुक्त ठरणारे विविध ऑनलाईन MOOC (Massive Online Open Courses) अभ्यासक्रम सुरू करण्यात आले आहेत.

या संकेतस्थळाचा उद्घाटन सोहळा प्रतिभा निकेतन शिक्षण संस्था, नांदेडचे विश्वस्त शंतनू डोईफोडे आणि महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. के. आर. गंगाखेडकर यांच्या हस्ते संपन्न झाला. या प्रसंगी दै.प्रजावाणीचे. गोवर्धन बियाणी यांची विशेष उपस्थिती लाभली. कार्यक्रमास उपप्राचार्य डॉ. डी. के. स्वामी, ग्रंथपाल डॉ. आर. ए. लाठकर, तसेच एन. एस. गायकवाड हे ही उपस्थित होते.

महाविद्यालयाच्या या उपक्रमांतर्गत Artificial Intelligence and Public Administration, Certificate Course in English for Employability, Introduction to Indian Knowledge System, निवेदन सूत्र संचालन : तंत्र आणि कौशल्य हे अभ्यासक्रम ऑनलाईन उपलब्ध आहेत.

हे सर्व अभ्यासक्रम मोफत असून कोणत्याही महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी तसेच सर्वसामान्यांसाठी खुले आहेत. नोंदणी केलेल्या विद्यार्थ्यांना संबंधित विषयातील तज्ज्ञ मार्गदर्शन करतील आणि अभ्यासक्रम पूर्ण झाल्यानंतर प्रमाणपत्र प्रदान केले जाईल. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. के. आर. गंगाखेडकर यांनी www. pratibhalearn.online या संकेतस्थळावर भेट देऊन नोंदणी करावी असे आवाहन केले आहे.

# मराठी भाषेतील अभिजात कलाकृती म्हणजे गावगाडा –प्रा. डॉ. जी.एस.पाटील

**नवीन नांदेड (प्रतिनिधी)–** महाराष्ट्रातील कृषीप्रधान ग्राम रचना, प्रशासन परंपरा, शेतकरी व शेतीविषयक कामे करणारे इतर कारू-नारू त्यांच्या श्रेणी आणि परस्पर संबंध यांची आत्रे यांनी सखोल चर्चा केली आहे. ही चर्चा करीत असताना संपूर्ण गावगाड्याची ऐतिहासिक चिकित्साही त्र्यंबक नारायण अत्रे यांनी आपल्या 'गावगाडा' ग्रंथात केली आहे. हा फक्त ग्रंथ नाही तर मराठी भाषेतील अतिशय उच्च अभिजात कलाकृती आहे, असे प्रतिपादन इतिहासाचे गाढे अभ्यासक डॉ.जी.एस.पाटील यांनी केले आहे.



श्री शारदा भवन एज्युकेशन सोसायटी संचालित इंदिरा गांधी वरिष्ठ महाविद्यालय सिडको नांदेड येथे ग्रंथावर बोलू काही या नाविन्यपूर्ण उपक्रमाअंतर्गत आयोजित पाचवे पुष्प गुफंवताना ते प्रमुख अतिथी म्हणून बोलत होते. पुढे ते म्हणाले की, गावगाडा या ग्रंथाचे अनेक आवृत्त्या निघाल्या असून भारतीय समाज व्यवस्था समजून घेण्यासाठी या ग्रंथाशिवाय पर्याय नाही, असे ते यावेळी म्हणाले. भारतीय समाज व्यवस्था अतिशय गुंतागुंतीची असली तरीही तिला ओळखण्याचे आपल्याकडचे नाव अगदी सोपे आहे ते म्हणजे 'गावगाडा'. महाराष्ट्रात हा गावगाडा कसा चालत होता, त्याची वैशिष्ट्ये कोणती होती, हे समजून घ्यायचे असेल तर आपल्या हाती त्रिंबक नारायण अत्रे लिखित गावगाडा हे सर्वोत्कृष्ट पुस्तक आहे, असे सांगून डॉ.पाटील यांनी ग्रंथातील अनेक उदाहरणे देऊन या ग्रंथाचे महत्व अधोरेखित केले आहे.

या कार्यक्रमाचे अध्यक्षीय समारोप करताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दुर्गेश रवंदे म्हणाले की, एखाद्या ग्रंथावर बोलताना गोळीबंद कसं बोलावं हे चांगले उदाहरण म्हणजे आजचे व्याख्यान आहे. आपण आयुष्यभर विद्यार्थी असलं पाहिजे, या व्याख्यानामुळे ग्रंथ वाचण्याची उत्सुकता वाढली. गावगाडा हा शब्दकोश नसून गावगाड्याची सविस्तर माहिती देणारा ज्ञानकोश आहे असे ते यावेळी म्हणाले.

याच कार्यक्रमात इंग्रजी विभागाचे प्राध्यापक डॉ.विशाल मस्के यांची बदली अर्धापूर येथे झाल्याबद्दल त्यांचा सत्कार व निरोप देण्यात आला. यावेळी डॉ. देशमुख, डॉ.मिर्झा, डॉ.पस्तापुरे, डॉ.भोपाळकर यांनी मनोगत व्यक्त केले. डॉ.मस्के यांनी सत्काराला भावनिक उत्तर दिले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ.काळे, सूत्रसंचालन डॉ.भोपाळे तर आभार प्रा.अपस्तंभ यांनी मानले. या कार्यक्रमास महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

# माणसाला केंद्रबिंदू मानून क्रांतिकारी लिखाण अण्णाभाऊंनी केले –डॉ.प्रा.अनंत राऊत



**नांदेड (प्रतिनिधी)–** साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांनी माणसाला केंद्र बिंदू मानून क्रांतिकारी लिखाण केले, असे मत प्रा.डॉ.अनंत राऊत यांनी मांडले.

साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त आंबेडकरवादी मिशन येथे आयोजित करण्यात आलेले जयंती सोहळ्यात डॉ.राऊत प्रमुख वक्ते होते. याप्रसंगी डॉ. रेखा वाडेकर, डॉ.यशवंत चव्हाण, उत्तम सोनकांबळे, प्रा.विनोद काळे, पोलीस उपनिरीक्षक यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी डॉ.प्रा.अनंत राऊत यांचा सेवानिवृत्तीबद्दल आंबेडकरवादी मिशनतर्फे मानपत्र देऊन सत्कार करण्यात आला. मातंग समाजातील विद्यार्थ्यांना अधिकारी करण्यासाठी आंबेडकरवादी मिशन येथे सर्व सुविधा उपलब्ध आहेत, याचा विद्यार्थ्यांनी लाभ घ्यावा असे आवाहन याप्रसंगी दीपक कदम यांनी केले.

# नांदेड तहसीलअंतर्गत विशेष सहाय योजनेतील डिबीटी न झालेल्या लाभार्थ्यांसाठी उद्या विशेष शिबिर

**नांदेड (प्रतिनिधी)–** नांदेड तहसील अंतर्गत विशेष सहाय योजनेतील डीबीटी न झालेल्या लाभार्थ्यांची डीबीटी करुन घेण्यासाठी लाभार्थ्यांचे आधार कार्डशी बँक खातेशी लिंक करणे, आधारकार्ड पुनर्जीवित करणे, मोबाईल लिंक करणे बाबत गुरुवार, दि. ७ ऑगस्ट २०२५ रोजी विशेष कॅम्प/मोहीम राबविण्यात येणार आहे.

नांदेड ग्रामीण अंतर्गत विशेष सहाय योजनेतील लाभार्थ्यांना कॅम्प तरोडा बु येथील मंडळ अधिकारी कार्यालय (शिवाजी हायस्कूल जवळ) येथे घेण्यात येणार असून त्या ठिकाणी नांदेड शहर, नांदेड ग्रामीण, तरोडा बु, नाळेश्वर, लिंबगांव मंडळातील लाभार्थ्यांनी उपस्थित राहावे, तसेच वसरणी मंडळ अधिकारी कार्यालय(डेअरी कॉर्नर ) येथे वसरणी, वाजेगांव, तुप्पा, विष्णुपुरी या मंडळातील असे एकूण १४६ लाभार्थ्यांचे डीबीटी करुन घेण्यात येणार आहे. या कामासाठी ब्रँच पोस्ट मास्टर व आधार किट संचालक, महसूल सेवक यांचे सहकार्य घेऊन सकाळी १० ते कार्यालयीन वेळेत करून घेण्यात येणार आहे.

ज्या लाभार्थ्यांची डीबीटी झाली नाही त्यांनी आधार कार्ड, पोस्ट खाते, अंपग असतील तर अपंगत्वाचे प्रमाणपत्र घेऊन कॅम्पचे ठिकाणी उपस्थित राहुन डीबीटी करुन घ्यावे, असे आवाहन तहसिलदार नांदेड यांनी केले आहे.

# महसूल सप्ताहाअंतर्गत सिडको येथील सेतू सुविधा केंद्रात विविध प्रमाणपत्रांचे वाटप

**नवीन नांदेड (प्रतिनिधी)–** महाराष्ट्र शासनाच्यावतीने जिल्हाधिकारी नांदेड आदेशान्वये नांदेड तहसील कार्यालयाअंतर्गत तहसीलदार संजय वारकड यांच्या मार्गदर्शनाखाली महसूल सप्ताहानिमित्त सिडको येथील विमल सेतू सुविधा केंद्र संभाजी चौक सिडको येथे छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान राबविण्यात आले. यावेळी विविध प्रमाणपत्राचे वाटप करण्यात वसरणी मंडळ अधिकारी तथा नायब तहसीलदार राजेंद्र शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले.




महसूल सप्ताहाअंतर्गत विविध प्रमाणपत्रे वाटप कार्यक्रम विमल सेतू येथे घेण्यात आला. यावेळी वसरणी येथील मंडळाधिकारी तथा नवनियुक्त नायब तहसीलदार अर्धापूर राजेंद्र शिंदे तसेच मंडळातील ग्राम महसूल अधिकारी मुंडे, सोनटक्के धनेगाव, सेतू संचालक संतोष बोडके बाबुळगाव, संतोष पाटील तुप्पा, राजश्री मिरजकर, नागनाथ स्वामी हडको, विजय जोंधळे, निलेश कोकाटे, सुनील वाळके, गजानन मोरे उपस्थित होते.

# अर्धापूरच्या ५ महसुल कर्मचाऱ्यांची नायब तहसीलदार म्हणून पदोन्नती



**अर्धापूर (प्रतिनिधी)–** नांदेड जिल्हा महसूल विभागातील अव्वल कारकून, मंडळधिकारी आदी कर्मचाऱ्यांना नायब तहसीलदारपदी सेवाज्येष्ठतेनुसार पदोन्नती देण्यात आली आहे. अर्धापूर महसूल विभागातील अधिकारी ५ मंडळ अधिकारी व अव्वल कारकून यांची महसुल दिनाच्या पुर्वसंध्येला नायब तहसीलदारपदी पदोन्नती झाली आहे.

शासकीय सेवेत नियमानुसार ठराविक कालखंडानंतर पुढील पदावर पदोन्नती दिली जाते. या नियमानुसार गुरुवारी राज्यातील महसूल विभागातील मंडलाधिकारी, अव्वल कारकून संवर्गातील महसूलच्या सेवकांना नायब तहसीलदारपदी पदोन्नती देण्यात आली. नांदेड महसूल विभागांतर्गत अर्धापूर तहसीलचे मंडळ अधिकारी अव्वल कारकून यांना सेवाज्येष्ठतेनुसार पदोन्नती देण्यात आली आहे. यात महसूल विभागातील मंडळ अधिकारी महेश वाकडे, जयश्री कोल्हे, अव्वल कारकुन रामेश्वर सावते, शालिनी धुळे, अरुणा सूर्यवंशी यांचा समावेश आहे. या पदोन्नतीबद्दल तहसीलदार रेणुकादास देवणीकर, शिवाजी जोगदंड, तलाठी लक्ष्मण देशमुख, रवी पल्लेवाड, उज्वला वानखेडे, नागोराव भांगे, रामराव भालेराव, सखाराम क्षिरसागर, गोविंद टेकाळे, छगनराव इंगळे यांच्यासह अनेकांनी शुभेच्छा दिल्या आहेत.

# स्तनपानापासून एकही बालक वंचित राहू नये -गटविकास अधिकारी आरबडवाड

**उमरी (प्रतिनिधी)–** स्तनपानापासून परिसरातील एकही बालक वंचित राहू नये यासाठी आरोग्य विभागाने चांगले काम करावे, असे आवाहन गटविकास अधिकारी व्ही.आर. आरबडवाड यांनी केले.




प्राथमिक आरोग्य केंद्र सिंधी येथे जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संगीता देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली सिंधी येथे गट विकास अधिकारी पंचायत समिती उमरी तथा या कार्यक्रमाचे उद्घाटक व्ही.आर. आरबडवाड यांच्या हस्ते स्तनपान सप्ताह कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी ते मार्गदर्शन करताना बोलत होते.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उपसरपंच प्रभाकर पाटील पुयड हे होते. कार्यक्रमाच्या प्रास्ताविकेत तालुका आरोग्य अधिकारी डॉ. एम.मए. देवराये यांनी गावातील स्तनदा माता, बालक, गरोदर माता तसेच बालकांचे लसीकरण याबाबत घ्यावयाची काळजी यासह अनेक आरोग्यविषयक माहिती दिली. या कार्यक्रमासाठी गटविकास अधिकारी व्ही.आर. आरबडवाड, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. एम.एम. देवराये, वैद्यकीय अधिकारी सिंधी डॉ.सोहेल शेख, पंचायत समिती विस्तार अधिकारी राजेश्वर भुरे, ग्रामपंचायत अधिकारी जय वंसागरे, समुदाय आरोग्य अधिकारी डॉ.भारतभूषण गजभे, उमेश मुळे, डॉ. मोनिका गजभे, डॉ.कल्पना जाधव, डॉ. स्नेहा पाटील, बी.एन. गाडे, अजय कुंटूरवार, आरोग्य सहाय्यीका जयश्री गोवंदे, संगीता गायकवाड, कविता चौधंते, लक्ष्मी पांचाळ, मीरा देवके, उर्मिला मिटके, सविता बडगे व वर्षा कवडेकर आदी कर्मचाऱ्यांची उपस्थिती होती. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार बालाजी ढगे यांनी केले.

### सिडको अण्णाभाऊ साठे सार्वजनिक जयंती मंडळाची कार्यकारिणी

**नवीन नांदेड (प्रतिनिधी)–** सिडको अण्णाभाऊ साठे सार्वजनिक जयंती महोत्सवाच्या अध्यक्षपदी सुरेश कांबळे तर कार्याध्यक्षपदी पप्पू गायकवाड, स्वागताध्यक्षपदी दया वाघमारे यांची निवड करण्यात आली. ही निवड जेष्ठ समाज बांधव तथा सेवानिवृत्त अधिकारी आर. जे.वाघमारे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत निवड करण्यात आली.

या बैठकीस जनार्दन गुपिले, संभाजी बसवंते, उत्तम घोडजकर, चंद्रकांत मेकाले, पी.एम. सुर्यवंशी, शंकर बसवंते, माधव राजकौर, डॉ.वाडेकर, किशन वाघमारे यांची उपस्थिती होती. बैठकीचे सुत्रसंचलन पी.एम. सुर्यवंशी यांनी आभार डॉ.वाडेकर यांनी केले. नतून अध्यक्ष व कार्याध्यक्ष यांच्या सत्कार करण्यात आला.

# न्यायालयासमोरील नवीन इमारतीसमोर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पुर्णाकृती पुतळा उभारण्याची मागणी



**नांदेड (प्रतिनिधी)–** जिल्हा न्यायालयासमोरील नवीन इमारतीसमोर भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पुर्णाकृती पुतळा उभारण्यात यावा, अशी नांदेड जिल्हा बहुजन समाज पार्टीच्यावतीने जिल्हाधिकारी कार्यालयात निवेदनाद्वारे करण्यात आली.

दिलेल्या निवेदनात बहुजन समाज पार्टीचे मराठवाडा झोन प्रभारी मनीष काळे यांनी नमूद केले आहे की, नांदेड जिल्ह्यातील न्यायालयासमोर भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा असणे आवश्यक आहे. त्यामुळे लोकशाहीचे मूल्य आणि संविधानाचे महत्व जनतेपर्यंत पोहोचेल.

निवेदन देताना बसपाचे जिल्हाध्यक्ष साहेबराव ढाकोरे, हदगाव माजी तालुकाध्यक्ष गणेश राऊत यांच्यासह आदी पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

निरोगी आरोग्याचा कानमंत्र

# निरामय

## बुरशीजन्य संसर्ग, नको दुर्लक्ष...

नायटा, नखांना बुरशी लागणे आणि पायांना येणारी दुर्गंधी असे अनेक बुरशीजन्य आजार पावसाळ्यात सर्रास होतात. मराठीमध्ये गजकर्ण आणि हिंदीमध्ये दाद, खाज, खुजली या सर्वसामान्य नावांनी ओळखल्या जाणाऱ्या बुरशीजन्य आजारांच्या तक्रारी घेऊन डर्मेटोलॉजिस्टकडे येणाऱ्या लोकांचे प्रमाण मान्सूनमध्ये खूप वाढते. बुरशी उबदार, ओलसर वातावरणात वाढते. पाऊस व दमटपणामुळे येणारा ओलसरपणा बुरशीसाठी अतिशय अनुकूल ठरतो. पावसाळ्यात कपडे नीट सुकत नाहीत, ओलसर कपडे, पादत्राणे आणि जागेत बुरशी सहज वाढते, त्यामुळे संसर्गांचा धोका वाढतो. घरांमध्ये हवा खेळती राहत नसेल, पावसाळ्यात तुम्ही स्वतःला, स्वतःचे कपडे आणि वस्तूंना पूर्णपणे सुके ठेवू शकत नसाल तर बुरशीजन्य आजारांना आयतेच आमंत्रण मिळते. मांड्यांचा आतील भाग, चेहरा, केसांच्या खालची त्वचा आणि नितंब या शरीरावरील भागांवर बुरशीजन्य संसर्ग होण्याचा धोका सर्वात जास्त असतो.

## जाडसर उशी घेऊन झोपणं वेळीच सोडा!



आपले आरोग्य चांगले राखण्यात झोपेचा महत्त्वपूर्ण वाटा असतो. अनिद्रेची समस्या असेल तर शरीराचे संतुलन बिघडते. त्यामुळे आहार, व्यायाम याशिवाय झोप हा आपल्या आरोग्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. दिवसातून किमान ८ तास झोप घेणे आवश्यक आहे. मात्र हल्ली हा नियम फॉलो करणं सर्वांना जमत नाहीये आणि त्यामुळेच अनेक आजारांना निमंत्रण मिळतंय. झोपताना सर्वात मोठी चूक असते ती म्हणजे डोक्याखालील उशी. डोक्याखाली जाडसर उशी घेऊन झोपायची तुम्हालाही सवय आहे का? असेल तर हे नक्की वाचा. कारण हे सर्वात जास्त तुमच्या आरोग्यासाठी नुकसानकारक ठरू शकते. मोठी उशी डोक्याखाली घेऊन झोपणं ही सवय अत्यंत चुकीची आहे आणि तुम्ही असं करत असाल तर अनेक आजारांना तुम्ही आमंत्रण देताय हे खरं आहे.



### हे होईल नुकसान...

- मानेचा त्रास : रात्री झोपताना मोठी उशी अथवा दोन उशा डोक्याखाली ठेवल्याने अनेक आजार उद्भवतात. सर्वात पहिला आजार म्हणजे मानेचा त्रास. उशी ठेवल्याने मानदुखी सतत चालू राहाते. यासाठी तुम्ही नेहमी लहान उशी अथवा अत्यंत मऊ उशीचा वापर करावा. उशीशिवाय झोपण्याची सवय अधिक चांगली ठरते.
- मणक्याचा त्रास : अनेकांना तरूण वयातच मणक्यात गॅप येण्याचा अथवा मणक्यात कळा येण्याचा त्रास सुरू होतो. याचे मूळ कारण सुरू होते ते म्हणजे डोक्याखाली मोठी उशी घेऊन झोपणे. मोठी उशी घेतल्याने मणक्याच्या हाडांवर परिणाम होतो. मोठ्या उशीच्या वापरामुळे आपल्या मणक्यातील हाडांमध्ये अनेक बदल होतात, ज्यामुळे पाठदुखीचा त्रासही उद्भवतो.
- मेंदूतील रक्तप्रवाहावर परिणाम : मोठ्या उशीचा परिणाम हा मेंदूतील रक्तप्रवाहावरही होतो. त्यामुळे ही सवय तुम्ही त्वरीत सोडावी. जाडसर उशीवर झोपल्यामुळे मेंदूपर्यंत नीट रक्तपुरवठा होत नाही आणि त्यामुळे केसांनाही योग्य पोषण मिळत नाही. यामुळे केसगळती प्रमाणही वाढते आणि त्याशिवाय त्वचाही खराब झालेली दिसून येते.
- खांदा आणि हातदुखी : अनेकजण सकाळी उठल्यानंतर हातामध्ये त्रास होत असल्याची तक्रार करतात. त्याचे मुख्य कारण म्हणजे जाडसर उशीवर डोकं ठेऊन झोपणं आहे. अनेकांना दोन उशांवर डोकं ठेवत झोपायची सवय असते. पण यामुळे खांद्याची हाडे खेचली जातात आणि त्यामुळे हातामध्ये दुखण्याचा त्रास सुरू होतो.
- मानसिक त्रास : जाडसर उशी घेतल्याने सतत कूस बदलण्याची सवय लागते आणि त्यामुळे झोपमोडही होते. झोप खराब झाल्याने ताणतणाव वाढतो आणि ताणतणाव अधिक वाढू लागला की दिवसभर काम करण्याची इच्छा होत नाही. तसंच अपूर्ण झोपेमुळे मानसिक त्रास वाढतो आणि चिडचिडही वाढते.



## झोपेतून उठून पाणी लाभाचे?



बरेचदा आपण पाहतो की, सकाळी उठल्यानंतर २ ग्लासापासून ते अर्धा लीटर पाण्यापर्यंत अनेक जण उपाशीपोटी पाणी पितात. काही जण सकाळीच उठून १ लीटर पाणी पितात. सकाळी उपाशीपोटी पाणी पिण्याचे अनेक आरोग्यदायी फायदे आहेत असं म्हटलं जातं. यामुळे पचनक्रिया चांगली राहते आणि मेटाबॉलिजम वाढण्यास मदत मिळते असं सांगण्यात येतं. मात्र हे खरं आहे का? सकाळी १ लीटर पाणि पिणे खरंच लाभदायक आहे का? आयुर्वेदानुसार, सकाळी उठून इतकं पाणी पिणे योग्य नाही. आयुर्वेद असं करण्यास कधीही सांगत नाही. आयुर्वेदानुसार, सकाळी नक्की किती पाणी प्यावे, इतके पाणी पिणे चांगले की वाईट याबाबत अधिक माहिती जाणून घ्या.



आयुर्वेदानुसार सकाळी इतके पाणी पिणे योग्य नसून आरोग्याला फायदा होण्याऐवजी नुकसान अधिक पोहचवते. डॉक्टरच्या मते जेव्हा सकाळी उठल्यानंतर तुम्ही त्वरीत अधिक पाणी पिता तेव्हा तुमच्या शरीरातील पचन अग्नी अत्यंत मंद होतो. कारण सकाळी आपल्या शरीरातील पचन अग्नी हा आधीपासूनच मंद झालेला असतो. जेव्हा तुम्ही पाणी पिता तेव्हा आग शांत करण्याचे हे काम करते. मात्र तुम्ही कोमट पाणी प्यायलात तर यामुळे मेटाबॉलिजम आणि पचनक्रिया अधिक चांगली होण्यास मदत मिळते. जास्त थंड पाणी हे मेटाबॉलिजमला नुकसानदायी ठरते. तसंच ही सवय लिव्हर, किडनी आणि मेंदूच्या नसांवरही दबाव आणून नुकसान पोहचवते. यामुळे नर्व्हस सिस्टिम प्रभावित होते आणि त्रास होतो.

### आयुर्वेदानुसार कसे प्यावे पाणी?

आयुर्वेदानुसार खूप पाणी एकत्र पिण्यापेक्षा एक एक घोट घेत प्यावे. तेदेखील केवळ १ ग्लास उठल्यानंतर पाणी कोमट करून प्यावे. या प्रक्रियेला आयुर्वेदात उष्णपान म्हणतात. आयुर्वेद नेहमी उठल्यानंतर सकाळी १ ग्लास कोमट पाणि प्यावे असा सल्ला देतं. १ लीटर अथवा त्यापेक्षा अधिक पाणी प्यावे असे आयुर्वेदात कुठेही म्हटलेलं नाही.

### काय आहे तथ्य?

चांगली त्वचा, रोगप्रतिकारक शक्ती, पचनक्रिया यासाठी सकाळी सर्वात आधी भरपूर पाणी प्यायला हवे, असा तुमचा समज असेल तर ते योग्य नाही हे जाणून घ्या. जर तुम्ही लीटरभर पाणी प्याल तर तुम्हाला दिवसभर पोट फुगल्यासारखे वाटू शकते, तसेच ते तुमची पचनशक्ती कमी करू शकते आणि कफ दोष वाढवू शकते. पाणी हे महत्त्वाचे आहे आणि तुम्हाला ते पुरेसे पिणे आवश्यक आहे. परंतु अधिक प्रमाणात नाही. तुमच्या शरीराला पाण्याची कधी गरज असते आणि अन्नाची कधी गरज असते हे तुम्हाला आपोआप कळते, त्यासाठी फक्त थोडासा सराव आवश्यक आहे आणि तुम्ही तुमच्या शरीराचे ऐकून त्यानुसार आहार करणे गरजेचे आहे.



**पाणी कधी आणि कसे प्यावे?**

जेव्हा तुम्हाला तहान लागते तेव्हा पाणी प्यावे. सकाळी उठल्यानंतर असो वा दिवसभरात कधीही असो पाणी हे नेहमी बसूनच प्यावे. उभं राहून कधीही पाणी पिऊ नये. याचा किडनीवर आणि सांध्यांवर परिणाम होऊन सांधेदुखीचा त्रास सुरू होतो. तसंच उभं राहून जलद गतीने पाणी प्याले जाते जे योग्य नाही.

## डाएट अन् वर्कआऊटच नव्हे या ५ चुका टाळा!



**वजन कमी करण्यासाठी कठोर परिश्रम घ्यावे लागतात. त्यासोबतच काही गोष्टी अतिशय कठोर आणि निश्चितपणे कराव्या लागतात. अनेकवेळा लोक वजन कमी करण्यासाठी धडपडतात, परंतु त्यांच्या छोट्या चुका त्यांच्या आणि फिटनेसमध्ये मोठा अडथळा बनतात. अशा परिस्थितीत या चुका वेळीच सुधारण्याची गरज आहे. जाणून घ्या वजन कमी करताना कोणत्या चुका टाळल्या पाहिजेत आणि कोणत्या गोष्टी लक्षात ठेवायला हव्यात. कारण अनेकदा फक्त डाएट किंवा वर्कआऊट करून चालत नाही. काही गोष्टी ठरवून करायला हव्यात किंवा अट्टाहासाने टाळायला पाहिजेत.**

### या ५ चुका टाळा...

- वजन कमी करणे हे आपले एकमेव ध्येय बनवू नका.
- शरीराला वजन कमी करण्याच्या प्रवासाशी जुळवून घेण्यासाठी १२ आठवडे लागतात. अशा परिस्थितीत शरीराच्या या अनुकूलतेकडे पराभव किंवा अपयश म्हणून पाहू नका.
- व्यायामाला शिक्षा बनवू नका.
- व्यायामाला शिक्षा म्हणून पाहणे ही मोठी चूक आहे.
- खाणे हा गुन्हा बनवू नका.
- प्रत्येक पाऊल, प्रत्येक कॅलरी आणि प्रत्येक किलोचा मागोवा ठेवू नका.



### असे राहा निरोगी

पावसाळ्यात आठवड्यातून 2 ते 3 वेळा उकडलेले शेंगदाणे, डाळी, मका, सुरण, कोलोकेसिया, काकडी आणि भोपळा इत्यादी खावे. याशिवाय राजगीर, कट्टू इत्यादी बाजरीही आठवड्यातून एकदा खाऊ शकता.

### अशा प्रकारे वजन कमी होईल

तुमच्या भूकेनुसार खा. व्यायामासाठी वेळ काढा. रोज वेळेवर झोपण्याची सवय लावा. जेव्हा तुम्ही काही खात किंवा पिता तेव्हा सस्टेनेबिलिटी लक्षात ठेवा. आयुष्याचा आनंद घ्यायला विसरू नका. आपल्या मित्रांसह, कुटुंबासह आणि प्रवास आणि कामाचा आनंद घ्या.

## आंघोळीसाठी कुटुंबात साबणाचे शेअरिंग नकोच!

**अनेक घरांमध्ये एक गोष्ट दिसून येते ती म्हणजे, घरातील सर्व सदस्य आंघोळीसाठी एकच साबण वापरतात. मग भले कोणी सदस्य आजारी असो वा पूर्ण निरोगी असो. अर्थातच ही वाईट गोष्ट आहे, कारण एकच साबण सर्वांनी वापरला तर त्यातून संक्रमण होण्याची शक्यता सर्वाधिक असते. पण अनेक घरांमध्ये प्रत्येक जण स्वतःसाठी वेगवेगळा साबण वापरत असल्याचे देखील दिसून येते. त्यांना त्यांच्या आंघोळीचा साबण कोणाशीही शेअर करणे आवडत नाही. आपण ज्या साबणाने आंघोळ करतो त्यावर ई. कोली, साल्मोनेला आणि शिगेला यासारखे भयंकर बॅक्टेरिया वाढत असतात. या विषाणूंमुळे शरीरावर कोणत्या प्रकारचे रोगही पसरतात की नाही, तेच आपण आज या लेखातून जाणून घेऊया...**

### साबणाद्वारे कोणते संक्रमण पसरू शकते?

साबण शेअर करणे हे बहुतांशी सुरक्षित असले तरी, तोच साबण शेअर केल्याने संसर्ग होऊ शकतो. फ्लोरिडा विद्यापीठाच्या फुटबॉल खेळाडूंवर 2008 साली केल्या गेलेल्या अभ्यासात आढळून आले की, ज्या प्लेयर्सने साबण शेअर केला त्यांना मेथिसिलिन-प्रतिरोधक स्टॅफिलोकोकस ऑरियस (MRSA), नामक एक प्रतिजैविक-प्रतिरोधक स्टॅफ संसर्गाची वारंवार होण्याची शक्यता होती. या प्रसारामुळे, यूएस सीडीसीने साबणासारख्या वैयक्तिक वस्तू शेअर न करण्याची शिफारस देखील केली आहे.

### स्वतःला सुरक्षित राखण्यासाठी काय करावे?

सर्वसाधारणपणे, साबणाची वडी एखाद्यासोबत शेअर केल्याने मोठा धोका निर्माण होत नाही. तथापि, जर तुम्हाला बॅक्टेरियापासून स्वतःचे संरक्षण करण्यासाठी साबण वडी शेअर करायची नसेल, तर तुम्ही बॉडी वॉश वापरण्यास सुरुवात करू शकता किंवा तुमच्या साबणाद्वारे इतर कोणाला जीवाणू हस्तांतरित होऊ नये असे तुम्हाला वाटत असल्यास, वापरल्यानंतर साबण धुवा आणि परत ठेवा. ओल्या साबणावर बॅक्टेरिया वाढण्याची शक्यता जास्त असते, त्यामुळे नेहमी कोरडा साबण वापरा. तुमच्या साबणाची डिश नेहमी स्वच्छ ठेवा.



### साबणावर कोणते बॅक्टेरिया वाढतात?

आरोग्य तज्ज्ञांच्या मते, साबणावर वाढणाऱ्या जंतूंमध्ये ई. कोली, साल्मोनेला आणि शिगेला बॅक्टेरिया तसेच नोरोव्हायरस आणि रोटाव्हायरस आणि स्टॅफ सारख्या विषाणूंचा समावेश असू शकतो. हे जीवाणू आणि विषाणू त्वचेवर जखमा किंवा ओरखड्यांद्वारे पसरतात, तर काही विष्ठेद्वारे पसरतात.

### साबणाची वडी आणि त्यावरचे बॅक्टेरिया

साबणावर जंतू असू शकतात. इंडियन जर्नल ऑफ डेंटल रिसर्चमध्ये एप्रिल-जून 2006 मध्ये केलेल्या अभ्यासात असे आढळून आले की, साबणाच्या वडीवर दोन ते पाच प्रकारचे जंतू असतात. याव्यतिरिक्त, अमेरिकन जर्नल ऑफ इन्फेक्शन कंट्रोलमध्ये जुलै 2015 मध्ये नोंदवलेल्या हॉस्पिटलच्या अभ्यासात असे आढळून आले की सुमारे 62 टक्के साबण वड्या दूषित होत्या, तर फक्त 3 टक्के लिक्विड साबण दूषित होते. शिवाय हे सिद्ध झाले की साबणावर लपलेले बॅक्टेरिया एखाद्या व्यक्तीपासून दुसऱ्या व्यक्तीपर्यंत पसरू शकतात.

### साबणाद्वारे कसे पसरतात आजार?

संशोधकांना असे आढळून आले की जरी विषाणू साबणावर वाढत असले तरी ते कोणत्याही प्रकारचे रोग एका शरीरातून दुसऱ्या शरीरात पसरवत नाहीत. द न्यूयॉर्क टाईम्सच्या मते, 1965 मध्ये प्रकाशित झालेल्या एका अभ्यासात, शास्त्रज्ञांनी प्रयोगाचा भाग म्हणून जाणूनबुजून सुमारे पाच अब्ज जीवाणू असलेल्या मातीत आपले हात बुडवले. हे जिवाणू स्टॅफ आणि ई. कोली सारखे आजार निर्माण करतात. यानंतर, शास्त्रज्ञांनी साबणाच्या वडीने आपले हात धुतले आणि त्याच साबणाने दुसऱ्या व्यक्तीचे हात धुतले. त्यांना असे आढळले की हे जीवाणू दुसऱ्या व्यक्तीकडे हस्तांतरित झाले नाहीत आणि त्यानंतर हा निष्कर्ष काढला गेला.



# मराठी सिनेमाचे अतिरिक्त शोज मल्टीप्लेक्समध्ये लागणार

## मराठी सिनेमा जगविण्यासाठी आणि वाढवण्यासाठी सरकार सुचवणार उपाययोजना

**मुंबई (प्रतिनिधी)**– मराठी सिनेमांना मल्टीप्लेक्समध्ये अतिरिक्त शोज मिळवून देण्यासाठी सरकारने कायमस्वरूपी तोडगा काढण्याचा विचार केला आहे. त्यासाठी शासन स्तरावर एक स्पेशल कमिटी स्थापन केली जाणार आहे. सरकारने याबाबत मल्टीप्लेक्स आणि थिएटर मालकांसोबत बैठक घेऊन यावर तोडगा काढण्यासाठी समिती नेमली आहे. या समितीला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या निर्देशानुसार येत्या दीड महिन्यात शासनाला अहवाल सादर करायचा आहे.



सध्या मराठी सिनेमांना थिएटर मिळत नसल्यामुळे मोठा वाद सुरु आहे. अनेक हिंदी सिनेमे प्रदर्शित झाल्यानंतर मराठी चित्रपट मल्टीप्लेक्समधून हटवण्यात आल्याच्या घटना घडत आहेत. यावर काही राजकीय पक्षांनी आपला आवाज उठवला होता. याच पार्श्वभूमीवर, एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वात ही बैठक पार पडली आहे. ज्यात मराठी सिनेमांसाठी एक विशेष समिती स्थापन केली गेली आहे. या समितीने दीड महिन्यात शासनाला अहवाल सादर करावा, मराठी सिनेमा जगला पाहिजे अशी राज्य शासनाची भुमिका असल्याचे उपमुख्यमंत्र्यांनी यावेळी सांगितले.

मराठी सिनेमांना मल्टिप्लेक्स मध्ये मिळणाऱ्या कमी स्क्रीन, तसेच त्यांना कोणतीही माहिती न देता तीन दिवसात सिनेमा थिएटरमधून उतरवणे, आठवड्याभराचे शुल्क घेऊन उर्वरित रक्कम परत न करणे, तसेच सेन्सॉर बोर्डाला वारंवार विनंत्या करूनही मराठी सिनेमांना सेन्सॉर संमती देण्याला विनंती करणे, मराठी सिनेमाच्या खेळांच्या वेळा ऐनवेळी बदलणे अथवा रद्द करणे यासारख्या अनेक प्रश्नांबाबत मराठी सिनेमांचे निर्माते, वितरक आणि विविध पक्षांच्या सिने कर्मचारी संघटनांसमवेत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या पुढाकाराने आज मंत्रालयात बैठक झाली.

यावेळी सांस्कृतिक मंत्री आशिष शेलार, वैद्यकीय शिक्षणमंत्री हसन मुश्रीफ, पर्यटन मंत्री शंभूराज देसाई, परिवहन मंत्री प्रताप सरनाईक, वित्त राज्यमंत्री आशिष जयस्वाल, गृहराज्यमंत्री योगेश कदम, उपमुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव नविन सोना, नगरविकास प्रधान सचिव डी. गोविंदराज, सांस्कृतिक कार्य विभागाचे सचिव किरण कुलकर्णी आणि इतर विभागांचे अधिकारी, मनसे चित्रपट सेनेचे अमेय खोपकर, शिवसेना चित्रपट सेनेचे सुशांत शेलार, राष्ट्रवादी चित्रपट सेनेचे बाबासाहेब पाटील, व्हिडीओ पॅलेसचे नानूभाई जयसिंघानी, वितरक समीर दीक्षित, चित्रपट महामंडळाचे अध्यक्ष मेघराज राजेभोसले, संदीप घुगे हेदेखील उपस्थित होते.

यावेळी उपमुख्यमंत्री शिंदे यांनी निर्माते, वितरक, मल्टीप्लेक्स मालक आणि इतर अधिकाऱ्यांचे म्हणणे जाणून घेतले. तसेच मराठी सिनेमाला प्रोत्साहन देण्याचे शासनाचे धोरण असून मराठी सिनेनिर्माता जगला तरच मराठी सिनेमाला चांगले दिवस येणार आहेत. त्यामुळे या प्रश्नावर कायमस्वरूपी उपाययोजना करण्यासाठी समिती स्थापन करण्याचा निर्णय घेतला असून या समितीचे अध्यक्ष गृह विभागाचे अपर मुख्य सचिव असून, प्रधान सचिव अपील आणि सुरक्षा, प्रधान सचिव नगरविकास २, सांस्कृतिक कार्य विभागाचे सचिव, परिवहन सचिव, मराठी सिनेमांचे निर्माते, वितरक, मल्टिप्लेक्स मालक,फिल्मसिटी अधिकारी, चित्रपट महामंडळाचे प्रतिनिधी, निर्माते महामंडळाचे प्रतिनिधी यांचा समावेश असेल, येत्या दीड महिन्यात आपला अहवाल सरकारला सादर करणार असून, त्यानंतर याबाबत शासन अंतिम निर्णय करेल असे उपमुख्यमंत्र्यांनी यावेळी सांगितले.

# एसटी महामंडळ यात्री ॲप आणणार –परिवहन मंत्री सरनाईक

**मुंबई (प्रतिनिधी)** – चालकांना सन्मानजनक मोबदला आणि प्रवाशांना सुरक्षित प्रवासाची हमी देणारे राज्य शासनाचे अधिकृत यात्री प लवकरच महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ (एसटी) मार्फत सुरू करण्यात येत आहे, अशी माहिती परिवहन मंत्री तथा एस. टी. महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिली.




मंत्रालयात आयोजित केंद्र व राज्य शासनाच्या प्रवासी वाहतुकीविषयी ग्रीगेटेड पॉलिसीच्या (समुच्चयक धोरण) अधीन राहून राज्य शासनाचे 'यात्री प' बनवण्याच्या अंतिम मसुद्यावरील बैठकीत मंत्री श्री. सरनाईक बोलत होते. या बैठकीला आमदार प्रवीण दरेकर, परिवहन विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव संजय सेठी, परिवहन आयुक्त विवेक भीमनवार, एसटी महामंडळाचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ.माधव कुसेकर व इतर अधिकारी उपस्थित होते.

यात्री प चालविण्यासाठी एसटी महामंडळाची प्रवाशांप्रती असलेली निष्ठा आणि वर्षानुवर्षापासूनची विश्वासार्हता उपयोगी पडणार असून उत्पन्नाचा नवा स्त्रोत निर्माण होणार आहे, असेही मंत्री श्री. सरनाईक सांगितले.

परिवहन मंत्री प्रताप सरनाईक म्हणाले, मराठी तरुणांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे, भरमसाठ नफा कमावून प्रवासी व चालकांना वेठीस धरणाऱ्या खासगी कंपन्यांच्या जोखडातून मुक्त करण्याच्या प्रामाणिक हेतूने आधुनिक तंत्रज्ञानावर आधारित प्रवासी ॲप बस, रिक्षा, टॅक्सी व ई–बस या वाहन सेवेकरीता सुरू करण्याचे निश्चित केले आहे. हे प परिवहन विभागाच्या सहकार्याने एसटी महामंडळामार्फत सुरू करण्यात येईल. भविष्यात एसटी महामंडळाला उत्पन्नाचा नवा स्त्रोत निर्माण करणे व प्रवाशांना एक विश्वासार्ह सेवा उपलब्ध करून देणे हा उद्देश समोर ठेवून हे प एसटी महामंडळाने नियंत्रित करावे, असेही परिवहन मंत्री श्री.सरनाईक यांनी यावेळी सांगितले.

## लोकायुक्त यांनी घेतली राज्यपालांची भेट

**मुंबई (प्रतिनिधी)**–राज्याचे लोक आयुक्त न्या. वि. मु. कानडे (नि.) यांनी उप लोक आयुक्त संजय भाटिया यांचेसह राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांची राजभवन, मुंबई येथे भेट घेऊन आपल्या कामकाजासंबंधीचा ५२ वा वार्षिक एकत्रित अहवाल राज्यपालांना सादर केला.

महाराष्ट्र लोक आयुक्त आणि उप लोक आयुक्त अधिनियम, १९७१ च्या कलम १२ पोटकलम (६) नुसार, सन २०२४ मधील लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांच्या कामकाजासंबंधी हा अहवाल सादर करण्यात आला. लोकायुक्त कार्यालयाने दिलेल्या माहितीनुसार २०२४ या अहवालाधीन वर्षात लोकायुक्त कार्यालयाकडे ६९२५ नवीन तक्रारी प्राप्त झाल्या. त्या पैकी २३१० तक्रारी स्वाक्षरी विरहित व इतर प्राधिकाऱ्यांना उददेशुन लिहिलेल्या अर्जाच्या प्रति असल्यामुळे नोंदविण्यात आल्या नाहीत. अशा प्रकारे अहवालाधीन वर्षात ४६१५ नवीन तक्रारी नोंदविण्यात आल्या.

## महावितरणचे वीज बिल डाऊनलोड करण्यासाठी आता 'लॉगिन' अनिवार्य

**मुंबई(प्रतिनिधी)**– सायबर सुरक्षितता तसेच वीज ग्राहक माहितीच्या गोपनीयतेसाठी महावितरणच्या लघुदाब वर्गवारीच्या वीजबिलाची पीडीएफ प्रत अधिकृत संकेतस्थळावरून ऑनलाइन डाऊनलोड करण्यासाठी आता संबंधित ग्राहकांना नोंदणीकृत प्रवेश (लॉगिन) करणे अनिवार्य करण्यात आले आहे. केंद्र शासनाच्या सायबर सुरक्षेच्या मार्गदर्शक तत्त्वानुसार हा बदल करण्यात आला आहे.

महावितरणच्या्ु.ारहरवळीलो.ळप या अधिकृत संकेतस्थळावरील 'वीजदेयक अवलोकन/भरणा' (View/Pay Bill) पेजवर लघुदाब वर्गवारीतील घरगुती, व्यावसायिक, औद्योगिक व इतर ग्राहकांना चालू महिन्याच्या वीजबिलाची पीडीएफ प्रत ऑनलाइन डाऊनलोड करण्याची सोय उपलब्ध करून देण्यात आली आहे. मात्र याआधी केवळ १२ अंकी ग्राहक क्रमांक सबमीट करून वीजबिल डाऊनलोड करण्याची सोय उपलब्ध होती.

आता नव्या बदलात वीज बिल लॉगिनशिवाय ऑनलाइन भरण्याचा पर्याय खुला ठेवण्यात आला आहे. मात्र पीडीएफ वीजबिल डाऊनलोड करण्यासाठी नोंदणीकृत प्रवेश (लॉगिन) करणे अनिवार्य आहे. लॉगिनची लिंकदेखील 'वीजदेयक अवलोकन/भरणा' (View/Pay Bill) पेजवर उपलब्ध आहे. तसेच ज्या ग्राहकांनी आतापर्यंत लॉगिनसाठी नोंदणी केलेली नाही त्यांनी ग्राहक क्रमांक, भ्रमणध्वनी क्रमांक तसेच ई–मेल (असल्यास) माहिती भरून नोंदणी करणे तसेच प्रवेश नाम (लॉगिन आयडी) व पासवर्ड (परवली शब्द) निश्चित करणे आवश्यक आहे.

त्यासाठी देखील लिंक त्याच ठिकाणी उपलब्ध आहे. नोंदणीकृत प्रवेश (लॉगिन) केल्यानंतर स्वतःच्या एकापेक्षा अधिक वीजजोडण्यांसाठी विविध ऑनलाइन सेवा उपलब्ध आहे. या सुविधेचा लाभ घेण्यासाठी लॉगिन केल्यानंतर १२ अंकी ग्राहक क्रमांक लक्षात ठेवण्याची आवश्यकता नाही. तसेच वीज बिलावरील नाव, वीज भार बदलणे, तक्रार करणे किंवा तक्रारीची सद्यस्थिती पाहणे, वीज बिलांचा भरणा, पत्ता बदलणे व इतर सर्व ऑनलाइन सेवांचा वीज ग्राहकांना लाभ घेता येईल.

## Change In Name

My old name is KHALIL PASHA SHAIKH which now I am changing as new name: KHALIL PASHA LIYAKHAT SHAIKH Hence forth my all correspondence will be done as per my new name please consider the same. Address: NAVI ABADI AT. POST MANJRAM TQ. NAIGAON MANJRAM NANDED-431722 Mo.9890047599

## Change In Name

My old name is SHAIKH MAKDOOM which now I am changing as new name: MAKDOOM NAZIR SAB SHAIKH Hence forth my all correspondence will be done as per my new name please consider the same

Address: H. NO 1-15-30, NOORANI MASJID JAWAL,SUNDAR NAGAR NANDED-431605

Contact Details: 9890178643

## Change In Name

MyOldNameis SAYEDISMAILwhichnow I am changing as New Name SYED ISMAIL Hence forth My All Correspondence will be done as per my new name. Please consider the same.Address: ROYAL FUNCTION HALL GANI COLONY NANDED 431605 MO.8087751923


## कुत्रीचे पिल्ले विकणे आहे

डॉबर मॅन, जर्मन शेफर्ड, ग्रेडन, लेबरा डॉग, पामोलियन इत्यादी १२० प्रकारच्या जातीची कुत्रीचे पिल्ले मिळतील.



संपर्क गोपालअण्णा
डॉग डिलर
मोबाईल नंबर
९८५०६८८५२८


## टी.सी.हरवली

माझी आशुतोष हैबतराव नरहरे या नावाची एम.बी.ए. ची टि.सी. छत्रपती चौक ते वर्कशॉप ऑटो प्रवासा दरम्यान हरवली आहेत कुणाला सापडल्यास खालील पत्त्यावर संपर्क साधावा –

**संपर्क पत्ता**
**आशुतोष हैबतराव नरहरे**
**मो.९५२७१६२६९६**

## टी.सी.हरवली

माझी प्रतीक्षा गंगाधर बसापुरे या नावाची दहावी पास ची टी.सी. मुखेड ते नांदेड या बसने प्रवास करीत असताना हरवली आहे. कोणास सापडल्यास कळवावे.

**संपर्क पत्ता**
**प्रतीक्षा गंगाधर बसापुरे**
**मु.पो. एकलार ता. मुखेड जि. नांदेड**

## टी.सी.हरवली

माझी सचिन मारोतराव नरंगले या नावाची बी.एस.डब्लू द्वितीय वर्षाची टि.सी. सिडको ते लातुर फाटा ऑटो प्रवासा दरम्यान हरवली आहेत कुणाला सापडल्यास खालील पत्त्यावर संपर्क साधावा –

**संपर्क पत्ता**
**सचिन मारोतराव नरंगले**
**रा.सिडको नांदेड**
**मो.९८२३८४४६२९**

## टी.सी.हरवली

माझी इमरान खान मोहम्मद खान या नावाची १० वी पासची टि.सी.,सनद गुणपत्रिका देगलूर नाका ते चौक ऑटोने प्रवासा दरम्यान हरवली आहेत कुणाला सापडल्यास खालील पत्त्यावर संपर्क साधावा –

**–संपर्क पत्ता –९–६–**
**५१८ रहेमतनगर गोल्डन बेकरी मोहमदिया मस्जीद जवळ देगलूर नाका नांदेड**
**मो.९७६३९९२२८५**

## जाहीर प्रगटन

मौजे स्थित गट क्रमांक ७२ व गट क्रमांक ९८ अनुक्रमे क्षेत्र १०० र सवल मरदार ०.७७ हे. आर मधुन अर्जदार श्री बालाजी होनाजी नखे रा जवळा मुरहार यांनी इतर अधिकारातील गैर अर्जदार अ. सं.कु. पुरभ्या गंग्या बेद (१००४४) ३८ ई महादया व नाम्या (१००४४) गट क्रमांक ७२ वर तसेच मोत्या माणिका डोंगरगाव १९५८ (१००५६) गट क्रमांक ९८ यांचे नाव कमी करणे बाबत या कार्यालयास अर्ज सादर केलेला आहे.

त्या अनुषंगाने प्रकरणात तलाठी सज्जा धनज व मंडळ अधिकारी बारड यांचेमार्फत चौकशी अहवाल व नमुद शेतजमीन विषयी तपासणी सूची देऊन अहवाल मागविण्यात आलेला होता, तलाठी सज्जा धनज यांचा अहवाल प्राप्त झाला असून इतर अधिकारात पुरम्या गस्या बेद (१००४४) ३८ ई महादया व नाम्या (१००४४) गट क्रमांक ७२ वर तसेच मोत्या माणिका डोंगरगाव १९५८ (१००५६) गट क्रमांक ९८ वर हे दोन्ही गटावरील कुळ किंवा त्याचे वारस गावात नाहीत असे पंचानी सांगितले असे उक्त अहवालात नमुद केले आहे.

करीता याव्दारे गैरअर्जदार पुरभ्या गंग्या बंद (१००४४) ३८ ई महादया व नाम्या (१००४४) गट क्रमांक ७२ वर तसेच मोत्या माणिका डोंगरगाव गट क्रमांक ९८ किंवा त्याचे काही वारसदार असल्यास त्यांना सुचित करण्यात येते की, सदर कुळ कमी करणे बाबत आपला काही आक्षेप अथवा काही सुचना असल्यास आपण आपले म्हणणे १५ दिवसांच्या आत म्हणजेच दिनांक ८/८/२०२५ रोजीपर्यंत कार्यालयीन वेळेत माझे समक्ष सादर करावयात. उक्त विहीत मुदतीनंतर प्राप्त झालेल्या कुठल्याही हरकती / सुचना स्वीकारण्यात येणार नाहीत तसेच प्रकरणात सर्व हितसंबंधानी आपले लेखी म्हणणे सादर न केल्यास कुठलीही हरकत नसल्याचे गृहीत धरून प्रकरणात नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

**(आनंद देऊळगावकर)**
**तहसिलदार मुदखेड**

## जाहीर प्रगटन

जाहीरप्रगटनाद्वारे सर्वं जनतेस सूचित करण्यात येते की, माझे पक्षकार सौ. सुनीता सुरेशसिंह बीसन रा. नांदेड ता.जी. नांदेड यांनी प्रशांत लक्ष्मणराव येनावार आणि रमेश केशवराव सरकोडावार रा. कैलास नगर नांदेड यांच्या मालकी व ताब्यातील तु. व जि. नांदेड, पोट तु. व ता. मौजे बारसगाव, ता. अर्धापुर जी. नांदेड येथील शेत गट क्रं. १८२ क्षेत्रफळ ०१ हे ३३ आर पैकी आमच्या हिस्साची हे ३२ आर, गट क्र. १९० क्षेत्रफळ ०२ हे ७९ आर पैकी आमच्या हिस्साची ०१ हे ०१ आर आणि गट क्र. १८९ क्षेत्रफळ ० हे ८० आर असे एकूण ०२ हे १३ आर जमीन जे एकमेकास लागन असून ज्याच्या, एकत्रित चतु:सीमा पुढील प्रमाणे आहेत :– पूर्वेस : सुरेश बखाल यांची शेत जमीन, पश्चिमेस : नागोराव चाग जी यांची शेत जमीन, दक्षिणेस :सरदेशपाडे यांची शेत जमीन व उत्तरेस : पांदण रस्ता.

वरील चतुर्सिमेचेआतील शेतजमीन सौ. सुनीता सुरेशसिंह बीसन रा. नांदेड ता.जी. नांदेड यांनी प्रशांत लक्ष्मणराव येनावार आणि रमेश केशवराव सरकोडावार यांच्याकडून खरेदी करण्याचा करार केला असून तसी सौदाचिठ्ठी केली आहे. तरी सर्व सबंधीत्तास या जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते कि, वरील नमूद शेतजमिनीवर कोणाचाही कसल्याही प्रकारे उजर, हक्क, आक्षेप, हरकत असल्यास हे जाहीर प्रगटन प्रसिद्ध तारखेपासुन सात (७) दिवसाच्या आत मूळ कागदपत्रासह खालील पत्यावर हरकत नोंदवावी, मुदत संपल्यानंतर कोणाचाही आक्षेप नाही असे समजून माझे पक्षकार सदरील शेतजमीनचा व्यवहार आपल्या हक्कात विक्रीखत करून घेतील करिता हे जाहीर प्रगटन.

**मार्फत**
**ॲड.अनिल व्ही.नांदेडकर**
**नविन मोंढा नांदेड मो.९८२२५३८३५**

## जाहीर प्रगटन

जनतेस व सर्व संबंधीतास या जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की, मौजे असदुल्लाबाद ता. जि. नांदेड, नदिड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड हद्दीतील सर्वे नं. ३८ दि. टिळक नगर को–ऑप. हौसिंग सोसायटी (म.) नदिड मधील प्लॉट नं.२२/१ व प्लॉट २३/१ असे दोन्ही प्लॉट मिळून त्यावर श्री तिरूमला सिव्हील वर्क्स लि.चे एम.डी.श्री कमलेश उत्तमराव बच्चेवार वय ४३ व्यवसाय – व्यापार रा. यशवंतनगर नांदेड यांनी दि.टिळक नगर को– ऑप. हौसिंग सोसायटी (म.) नदिड यांचे सहमतीने लक्ष्मीनारायण अपार्टमेंटचे बांधकाम केलेले आहे.

सदरील लक्ष्मीनारायण अपार्टमेंट मधील फ्लॅट खाली दर्शविलेल्या माहितीप्रमाणे खालील व्यक्तींना त्यांनी कायमची विक्री करण्याचा करार केलेला आहे. व सर्व संबंधिताकडून काही ईसारा रक्कम नगदी स्विकारलेली आहे आणि उर्वरीत रक्कम दस्त नोंदणी करतांना घेण्याचे ठरले आहे.

| अ.क्र | फ्लॅट नं. | खरेदीदाराचे नाव | फ्लॅटचे क्षेत्र. | चुर्तुसिमा पुर्वस | पश्चिमेस | दक्षिण | उत्तर |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | फ्लॅट नं. ३०३ १ बीएचके ३ मजला | १ श्री.अतिश बाबुराव गड्डपवार रा.करडखेड ता.देगलूर | ३७.३५ चौरस मिटर | डक्ट व लिफ्ट व सामाई पॅसेस | फ्लॅट नं.३०२ | प्लॉट नंबर २२ व २३ ची मोकळी जागा | फ्लॅट नं.३०२ चा भाग व सामाई पॅसेस |
| २ | फ्लॅट नं. ३ १ बीएचके तळ मजला | श्री संतोष बालाजीराव मारकवार रा.आंबेडकरनगर नांदेड | ३७.३५ चौरस मिटर | डक्ट व लिफ्ट व सामाई पॅसेस | फ्लॅट नं.२ | फ्लॅट नंबर २२ व २३ ची मोकळी जागा | फ्लॅट नं.२ व सामाई पॅसेस |
| ३ | फ्लॅट नं. २ २ बीएचके तळ मजला | मनिषा पोशट्टी पोकपवाड रा.समर्थ नगर नांदेड | ५५.९५ चौरस मिटर | फ्लॅट नं.३ व सामाई पॅसेस | प्लॉट नंबर २३ व २३ ची मोकळी जागा व प्लॉट नंबर २४ | फ्लॅट नंबर २३ चा भाग व प्लॉट २३ ची मोकळी जागा | फ्लॅट नं.१ |
| ४ | फ्लॅट नं. १०३ १ बीएचके पहिला मजला | सौ.दया विनायक पाटील व पवन विनायक पाटील | ३७.३५ चौरस मिटर | डक्ट व लिफ्ट व सामाई पॅसेस | फ्लॅट नं.१०२ | प्लॉट नंबर २३ व २३ ची मोकळी जागा व | फ्लॅट नं.१०१ व सामाईक पॅसेस |

वरीलप्रमाणे दर्शविलेल्या फ्लॅट व किंवा अपार्टमेंटबद्दल सर्व हित संबंधितांना व जनतेला कळविण्यात येते की, सदर फ्लॅट वर किंवा अपार्टमेंटबद्दल कोणाचा कोणताही उजर / आक्षेप असेल तसेच सदरील प्लॉट / फ्लॅट कोटे गहाण असतील किंवा त्यावर कोणत्याही प्रकारचा सरकारी, निमसरकारी, वित्तीय संस्थेचा बोजा असेल, तसेच कुळ, ईतर हक्क या बाबतीत काही आक्षेप असतील तर हे जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून ७ (सात) दिवसाचे आत लेखी आक्षेपासह व कागदपत्राच्या पुराव्यासह सोसायटीचे अध्यक्ष अथवा सचिव यांचेकडे दाखल करावेत, कालावधी संपल्यानंतर कोणताही आक्षेप / उजर स्विकारल्या जाणार नाही. मुदतीनंतर कोणाचा कोणताही आक्षेप प्राप्त न झाल्यास श्री तिरूमला सिव्हील वर्क्स प्रा.लि.नांदेडचे एम.डी. श्री कमलेश उत्तमराव बच्चेवार यांचे नावावरून १. श्री अतिश बाबुराव गडपवार २. श्री संतोष बालाजीराव मारकवार ३. मनिषा पोशट्टी पोलपवाड ४. सौ. दया विनायक पाटील व पवन विनायक पाटील यांचे नावावर हस्तांतरीत करण्यात येतील.करीता हे जाहीर प्रगटन देण्यात येत आहे. सर्व संबंधितांना यांची नोंद घ्यावी.

**अध्यक्ष**
**टिळकनगर सहकारी गृहनिर्माण संस्था म. नांदेड**

## जाहीर प्रगटन

सर्व जनतेस व संबंधीतास जाहिर प्रगटना द्वारे कळविण्यात येते की, माझे पक्षकार देवीदास मल्हारी बारसे, वय : ५४ वर्ष, धंदा : शेती, रा. अर्धापुर ता. अर्धापुर जि. नांदेड यांनी दिलेल्या माहिती अधिकारा वरुन पुढील प्रमाणे जाहिर प्रगटन देण्यात येते की, तुकाराम ऊर्फ बबन माधवराव पताळे, वय :३९ वर्ष, धंदा : शेती, देळूब (बु.) ता. अर्धापुर जि. नांदेड यांचे मालकी व ताब्यातील मौजे देळूब (बु.) ता. अर्धापुर जि. नांदेड येथे शेत गट क्र. २७९ मधील त्यांच्या मालकी व ताब्यातील गटाचा भाग ० हे. ४० आर संपुर्ण शेत जमीन

सदर शेत जमीनीची चर्तु:सिमा पुर्वेस : प्रकाश कचरु पावडे यांचे शेत, पश्चिमेस : चांदु कचरु पावडे यांचे शेत, दक्षिणेस : राजु विठ्ठलराव पावडे यांचे शेत, उत्तरेस : शोऐबखान युसुफजई यांचे शेत वरील वर्णनाच्या आतील शेत जमीन अंतरिक व बाह्य हक्कासह माझे पक्षकाराने ताबेदार व मालक यांच्याकडून कायम स्वरुपी खरेदी करण्याचा करार पंचा समक्ष केला असुन त्यांचा रजि. नोंदणी दस्त क्र. ३२२ दिनांक ०४/०८/२०२५ असा आहे. सदर कराराच्या बयाना पोटी माझे पक्षकार यांनी इसार (बयाना) दिलेली आहे. उर्वरित शिल्लक रक्कम देऊन माझे पक्षकार सदर वर्णनाचे शेत जमीन रजिस्ट्री करुन घेणार आहेत. सदर शेत जमीनी संबंधी कोणाचाही कोणत्याही स्वरुपाचे हित संबंध वारस हक्क भाऊ भाऊबंधकी विवाद न्याय प्रविष्ठ प्रकरण भू–संपादन अथवा बक्षिस पत्र, दान पत्र किंवा कोणत्याही शासकीय अथवा निमशासकीय बँकेचे कर्ज बोजा, गहाण, तारण, इत्यादी कोणत्याही स्वरुपाचे काही उजर अथवा आक्षेप आल्यास सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन १४ दिवसाच्या आत आपले उत्तर व आक्षेप कागदपत्रे पुराव्यासह माझ्या कार्यालयात लेखी दाखल

करावे, मुद्दतीत उजर व आक्षेप न आल्यास माझे पक्षकार वरील व्यवहार पुर्ण करतील म्हणजे विक्री खत करुन घेणार आहेत. मुद्दतीनंतर आलेले उजर किंवा आक्षेप गृहित धरले जाणार नाहीत. आणि माझ्या पक्षकारावर ते बंधनकारक राहणार नाहीत. करीता हे जाहिर प्रगटन

दिनांक ०४/०८/२०२५

| | |
|---|---|
| **मार्फत** | **जाहीर प्रगटन देणार** |
| **ॲड.पी.एम.सरोदे** | **देवीदास मल्हारी बारसे** |
| **मो.८८३०६६७१६५** | **रा.अर्धापुर ता.अर्धापुर जि.नांदेड** |
| **९८२३६८१९९२** | |

## जाहीर प्रगटन

सर्व जनतेस व संबंधीतास जाहिर प्रगटना द्वारे कळविण्यात येते की, माझे पक्षकार देवीदास मल्हारी बारसे, वय : ५४ वर्ष, धंदा : शेती, रा. अर्धापुर ता. अर्धापुर जि. नांदेड यांनी दिलेल्या माहिती अधिकारा वरुन पुढील प्रमाणे जाहिर प्रगटन देण्यात येते की, प्रकाश कचरु पावडे, वय : ३५ वर्ष, धंदा : शेती, पुयणी ता. जि. नांदेड यांचे मालकी व ताब्यातील मौजे देळूब (बु.) ता. अर्धापुर जि. नांदेड येथे शेत गट क्र. २७९ मधील त्यांच्या मालकी व ताब्यातील गटाचा भाग ० हे. ६६ आर या पैकी ० हे. ४० आर शेत जमीन

सदर शेत जमीनीची चर्तु:सिमा पुर्वेस : विक्रत्याचे शिल्लक शेत, पश्चिमेस : चांदु कचरु पावडे यांचे शेत, दक्षिणेस : राजु विठ्ठलराव पावडे यांचे शेत, उत्तरेस : शोऐबखान युसुफजई यांचे शेत वरील वर्णनाच्या आतील शेत जमीन अंतरिक व बाह्य हक्कासह माझे पक्षकाराने ताबेदार व मालक यांच्याकडून कायमस्वरुपी खरेदी करण्याचा करार पंचा समक्ष केला असुन त्यांचा रजि. नोंदणी दस्त क्र. ३२३ दिनांक ०४/०८/२०२५ असा आहे. सदर कराराच्या बयाना पोटी माझे पक्षकार यांनी इसार (बयाना) दिलेली आहे. उर्वरित शिल्लक रक्कम देऊन माझे पक्षकार सदर वर्णनाचे शेत जमीन रजिस्ट्री करुन घेणार आहेत. सदर शेत जमीनी संबंधी कोणाचाही कोणत्याही स्वरुपाचे हित संबंध वारस हक्क भाऊ भाऊबंदकी विवाद न्याय प्रविष्ठ प्रकरण भू–संपादन अथवा बक्षिस पत्र, दान पत्र किंवा कोणत्याही शासकीय अथवा निमशासकीय बँकेचे कर्ज बोजा, गहाण, तारण, इत्यादी कोणत्याही स्वरुपाचे काही उजर अथवा आक्षेप आल्यास सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन १४ दिवसाच्या आत आपले उत्तर व आक्षेप कागदपत्रे पुराव्यासह माझ्या कार्यालयात लेखी दाखल करावे, मुद्दतीत उजर व आक्षेप न आल्यास माझे पक्षकार वरील व्यवहार पुर्ण करतील म्हणजे विक्री खत करुन घेणार आहेत. मुद्दतीनंतर आलेले उजर किंवा आक्षेप गृहित धरले जाणार नाहीत. आणि माझ्या पक्षकारावर ते बंधनकारक राहणार नाहीत.

| | |
|---|---|
| **मार्फत** | **जाहीर प्रगटन देणार** |
| **ॲड.पी.एम.सरोदे** | **देवीदास मल्हारी बारसे** |
| **मो.८८३०६६७१६५** | **रा.अर्धापुर ता.अर्धापुर जि.नांदेड** |
| **९८२३६८१९९२** | |

स्थलांतर
सिटी मॅक्स डिजिटल कलर
मो.7058766021,9422185282
गड्डम मार्केट,पहिला मजला,
शिवाजी नगर,नांदेड

# गोदातीर समाचार

पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस
हर्बल ट्रिटमेंट
१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...

किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकून, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.
पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड
मो. 9284804221, 9637704308



## लोहा-कंधारच्या जनतेचे उपकार कधीच विसरू शकत नाही -आ. प्रतापराव चिखलीकर

**कंधार (प्रतिनिधी)**- लोहा - कंधार विधानसभा मतदार संघातील जनतेने मला सामान्य कुटुंबातून आमदार पदापर्यंत पोहोचवले. माझ्या प्रत्येक सुख-दुःखात आपण पाठीमागे खंबीरपणे उभे राहिलात. त्यामुळेच प्रतापराव पाटील चिखलीकर यांचे नेतृत्त्व उभे राहू शकले. त्यामुळे चिखलीसह लोहा-कंधार विधानसभा मतदारसंघातील जनतेचे प्रेम मी कधीही विसरू शकत नाही. त्यांच्या उपकाराची परतफेडू करू शकत नाही, असे भावनिक उद्‌गार आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी काढले. आ. चिखलीकर यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांच्या मूळ गावी चिखली येथे ग्रामस्थांच्या वतीने सत्कार आयोजित करण्यात आला होता. त्या सत्कारात जनतेशी संवाद साधताना आमदार चिखलीकर बोलत होते.

राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीचे नेते, माजी खासदार तथा लोहा, कंधार विधानसभा मतदारसंघाचे आ. प्रतापराव पाटील चिखलीकर, प्रवीण पाटील चिखलीकर यांच्या वाढदिवसानिमित्त हभप प्रकाश महाराज साठे यांचा कीर्तन सोहळा शंकरराव पाटील पवळे व समस्त गावकऱ्यांच्या वतीने चिखली ता. कंधार येथे पार पडला.

कीर्तन सोहळा पार पडण्यापूर्वी चिखली गावातून मिरवणूक काढण्यात आली. या सोहळ्यास कोलंबी मठ संस्थानचे मठाधिपती यदुवन महाराज, चिखली येथील मठ संस्थांचे रतन गिरी महाराज, श्रीमती ललिताबाई पाटील चिखलीकर, सौ. प्रतिभाताई पाटील चिखलीकर, माजी आमदार ओमप्रकाश पोकर्णा, माजी आमदार मोहनराव हंबर्डे, दक्षिण जिल्हाध्यक्ष शिवराज पाटील



होटाळकर, जिल्हाध्यक्ष बाळासाहेब पाटील रावणगावकर, वसंतराव सुगावे, सौ. वैशालीताई चव्हाण, स्वप्नील चव्हाण, संदीप पाटील चिखलीकर, सचिन पाटील चिखलीकर, सौ. अनुसयाताई केंद्रे, राष्ट्रवादी महिला कॉंग्रेस पार्टी जिल्हाध्यक्षा सौ. सुनंदाताई जोगदंड, शहर जिल्हाध्यक्षा सौ. सुरेखाताई पाटील, किरण वट्टमवार, माजी सभापती बाबुराव केंद्रे, माजी उपनगराध्यक्ष दत्ता वाले, माजी सभापती आनंदराव पाटील शिंदे ढाकणीकर, बारूळचे सरपंच शंकरराव नाईक, गणेशराव सावळे, कंधार तालुकाध्यक्ष मनोहर पाटील भोसीकर, गुलाब पाटील उबाळे, प्रल्हादराव उमाटे, सुरेशराव बास्टे, छत्रपती संभाजी नगरचे आय. जी. जाधव, मनोज पाटील, सदाशिवराव पापडवाड, चिखली गावचे सरपंच साहेबराव पोटफोडे, अच्युत पवळे, दगडू पाटील गायकवाड, मोहनराव पवळे, महाजन पाटील, नामदेव पवळे, सतीश पोवळे यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सेलिब्रिटी अँकर मयुरी परब यांनी केले. दरम्यान ग्रामस्थांच्या वतीने आ. चिखलीकर यांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी पुढे बोलताना आ. प्रतापराव पाटील चिखलीकर म्हणाले की, लोहा - कंधार विधानसभा मतदारसंघातील जनतेने मला अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतही साथ दिली आहे. या भागातील जनतेने मला कधीही वाऱ्यावर सोडले नाही. त्यामुळे माझ्या कुटुंबातील वडीलधाऱ्यांप्रमाणेच या मतदारसंघातील प्रत्येक कुटुंबातील व्यक्तीचा माझ्यावर अधिकार आहे. मी आणि माझे कुटुंबीय आपल्या सुख-दुःखात सहभागी होण्याचा सातत्याने प्रयत्न करत असतो. भविष्यात आपल्या प्रत्येक अडीअडचणीला मी सोबत राहीन. शिवाय या भागाच्या सर्वांगीण विकासासाठी कटिबद्ध आहे, असा विश्वासही त्यांनी यावेळी दिला.

## रक्षा बंधनानिमित्त विविध राख्या बाजारपेठेत दाखल

**नवीन नांदेड (प्रतिनिधी)**- सिडको - हडको परिसरातील बाजारपेठेत नारळी पौर्णिमा रक्षाबंधन सणानिमित्ताने विविध राख्या अनेक व्यापाऱ्यांनी सयारा, पुष्पा, विराट, राधा, कृष्ण, ओम स्वास्तिक, महाकाल, मैरे भैय्या, गणपती कमल, ॲपप्ल, मोटू-पतलू यासह विविध आकर्षक राख्या बाजारात आल्या आहेत. या राख्या महाराष्ट्र राज्यातील मुंबई, पुण्यासह गुजरातमधील सुरत, अहमदाबाद येथून आकर्षक व नवीन स्वरूपातील विविध कलाकृती असलेल्या राख्या बाजारपेठेत उपलब्ध झाल्याने बाजारपेठेत महिलांसह युवतींची मोठ्या प्रमाणात गर्दी पाहावयास मिळत आहे.



नारळी पौर्णिमा, रक्षाबंधना-निमित्त सिडको-सिडको परिसरातील बाजारपेठेत अनेक आकर्षक अशी दुकानांची सजावट करण्यात आली आहे. रक्षाबंधन निमित्ताने अनेक कलाकृतीतून नवीन स्वरूपातील तिरंगा राखी, कुंदन, मारवाड़ी, रेशीम, सोनेरी, कोल्हापुरी चांदीची, रुद्राक्ष तर लहान मुलांसाठी बेनटेन, कार्टून, म्यूजिकल, लाईट, गोंडा, अशा अनेक प्रकारच्या राख्या बाजारपेठेत महाराष्ट्र, गुजरात, हैद्राबाद या राज्यातील अनेक जिल्ह्यातून आणल्या आहेत. विशेषतः मेरे भैय्या, पारंपरिक राख्या गोंडा यासह चांदीच्या व अन्य आकर्षक राख्या बाजारपेठेत उपलब्ध झाल्यामुळे महिलांसह मुलींनी खरेदीसाठी गर्दी केली आहे, तर सराफा बाजारपेठेमध्ये सोन्या-चांदीच्या दुकानातही चांदीच्या आकर्षक असलेल्या राख्या विक्रीसाठी आल्या आहेत.

यावर्षी प्रथमच सिडको भागात इकोफ्रेंडली, बांबू, गायीच्या शेणापासून, कागदापासून हाताने आकर्षक बनविलेल्या राख्या बाजारात आल्या असून, चीनच्या राख्या बाजारातून हद्दपार झाल्या आहेत. सिडको-हडकोसह नांदेड परिसरातील बाजारपेठेत राख्या खरेदी करण्यासाठी गर्दी झाल्याचे पाहावयास मिळत आहे.

## प्राथमिक शिक्षकांच्या ऑनलाईन बदल्यांमध्ये हेराफेरी झाल्याचा आरोप; चौकशीची मागणी

**अर्धापूर (प्रतिनिधी)** - प्राथमिक शिक्षकांच्या ऑनलाईन बदल्यांमध्ये अनेक प्राथमिक शिक्षकांनी अपंग असल्याचे प्रमाणपत्र दाखल केले. तसेच ॲन्जिओप्लास्टी ही शस्त्रक्रिया केल्याचे दाखविले. त्यामुळे अशा शिक्षकांना 'संवर्ग एक'मधून वगळण्यात यावे, राज्य सरकार अपंग असल्याचे खोटे प्रमाणपत्र काढलेल्या शिक्षकांवर काय कारवाई करते याकडे जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

शिक्षकांच्या बदल्या करण्या-साठी एका खाजगी कंपनीला कॉन्ट्रॅक्ट देण्यात आले आहे. त्यांची मुदत ऑगस्ट महिन्यात संपत असल्यामुळे लवकरात लवकर बदल्या करून अनेक अधिकारी आर्थिक व्यवहार करून आपले चांगभले करून घेण्यासाठी खोटे अपंग प्रमाणपत्र मिळवून घेत आहेत. या प्रमाणपत्राची चौकशी न करता प्राथमिक शिक्षकांच्या ऑनलाईन बदल्या करण्यासाठी मोठे रॅकेट असून, यामध्ये मोठ्या प्रमाणात हेराफेरी होत असल्याची चर्चा होत आहे.

नांदेड जिल्हा परिषदेने ॲन्जिओप्लास्टी केलेल्या शिक्षकांना व अपंग असल्याचे खोटे प्रमाणपत्र जोडलेल्या शिक्षकांना संवर्ग एकमधून वगळण्यात यावे. शिक्षकांनी मुंबई उच्च न्यायालयात रिट याचिका दाखल केली असून, महाराष्ट्र सरकारने प्राथमिक शिक्षकांच्या बदल्यांमध्ये मोठ्या प्रमाणात घोळ होत असल्याची चर्चा आहे.

सरकारने प्राथमिक शिक्षकां-च्या बदल्या कोणाच्याही वशीलेबाजीने न करता निःपक्षपाती धोरणाने व आर्थिक व्यवहार न करता बदल्या कराव्यात तसेच नांदेड जिल्हा परिषद व महाराष्ट्र महाराष्ट्र सरकारने खोटे प्रमाणपत्र जोडलेल्या शिक्षकांची चौकशी करून सर्वसामान्य शिक्षकांना न्याय द्यावा. यासाठी राज्य सरकारने लक्ष द्यावे, अशी मागणी सामाजिक कार्यकर्त्यांनी निवेदनाद्वारे केली आहे.

शिक्षकांच्या बदल्यांमध्ये पारदर्शकता यावी, यासाठी शासनाचे प्रयत्न सुरू असून, 'संवर्ग एक' चा लाभ घेणाऱ्या शिक्षकांविरोधात कार्यवाहीची मागणी सामाजिक कार्यकर्त्यांनी लावून धरली आहे.

ॲन्जिओप्लास्टी शस्त्रक्रिया व अपंग असल्याचे प्रमाणपत्र अनेक प्राथमिक शिक्षकांनी जोडले असून, या खोट्या प्रमाणपत्राची चौकशी करून खोटे प्रमाणपत्र जोडणाऱ्या शिक्षकांविरुद्ध कडक कारवाई करावी, अशी मागणी निवेदनाद्वारे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, शिक्षण मंत्री दादा भुसे तसेच माजी खासदार किरीट सोमय्या यांच्याकडे केली आहे. राज्य सरकार या खोट्या ॲन्जीओप्लास्टी व अपंग प्रमाणपत्राची चौकशी करून काय कारवाई करणार याकडे सबंध महाराष्ट्राचे लक्ष लागले आहे.

## यूपीएससी परीक्षेत सागर नाठे देशातून सहावा

**नवीन नांदेड (प्रतिनिधी)** - एसजीजीएस अभियांत्रिकी व तंत्रशास्त्र संस्था विष्णुपुरी नांदेड या संस्थेतून स्थापत्य व जलव्यस्थापन अभियांत्रिकीची २०१६ मध्ये पदवी प्राप्त केलेला विद्यार्थी सागर नाठे यांनी केंद्रीय लोकसेवा आयोगामार्फत (यूपीएससी) घेण्यात आलेल्या वैज्ञानिक (सिव्हिल) गट 'अ' परीक्षेत देशात सहावा क्रमांक पटकावून एसजीजीएस संस्थेचे नाव उज्ज्वल केले आहे. त्याच्या रूपाने एसजीजीएस संस्थेच्या मुकुटात अजून एक मनाचा तुरा खोवला गेला आहे.



विद्यार्थ्यांमधील तांत्रिक ज्ञानाची कसोटी लागणाऱ्या वैज्ञानिक (सिव्हिल) गट 'अ' परीक्षेत देशात ६ वा क्रमांक मिळवणे म्हणजेच त्यांनी केलेल्या परिश्रमाची पावतीच होय. एसजीजीएस अभियांत्रिकी व तंत्रशास्त्र संस्था विष्णुपुरी नांदेड या संस्थेतून शिक्षण पूर्ण केलेले अनेक विद्यार्थी आयएएस, यूपीएससी, गेट (ग्रॅज्युएट एप्टिट्यूट टेस्ट इन इंजिनियरिंग), महाराष्ट्र लोकसेवा आयोग, अशा अनेक मानाच्या परीक्षेत आणि आंतरराष्ट्रीय पातळीवरील स्पर्धा, देश पातळीवरील स्पर्धा अशा अनेक स्पर्धेत देदीप्यमान यश मिळवत आहेत. यात दिवसेंदिवस वाढ होताना दिसत आहे.

एका शेतकऱ्याच्या कुटुंबात जन्म घेतलेला मुलगा सागर नाठे यांनी जणू हेच सिद्ध केले आहे की, जिद्द व कठोर परिश्रमाने कोणत्याही यशाला गवसणी घालता येते व विविध अडचणींमधूनही मार्गक्रमण करता येते. सागर गजानन नाठे याचा जन्म अकोट तालुक्यातील सातपुड्याच्या पायथ्याशी असलेल्या मुंब्रा गावातील असून, त्यांचे प्राथमिक शिक्षण जिल्हा परिषद प्राथमिक शाळा उंबरा आणि पाचवी ते दहावी लोकमान्य विद्यालय उमरा येथे झाले. पुढील अभियांत्रिकी शिक्षणासाठी त्यांनी एसजीजीएस अभियांत्रिकी व तंत्रशास्त्र संस्था विष्णुपुरी नांदेड या संस्थेची निवड केली व २०१६ मध्ये स्थापत्य व जलव्यवस्थापन अभियांत्रिकीची पदवी संपादन केली.

सागर गजानन नाठे यांच्या या यशाबद्दल संस्थेच्या नियामक मंडळाचे अध्यक्ष सुनील रायठ्ठा, नियामक मंडळाचे इतर सदस्य, संचालक डॉ. मनेश कोकरे, संस्थेतील विद्यार्थी, विविध विभागांचे अधिष्ठाता, विभाग प्रमुख, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांचेकडून त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

## विविध ८६ पदांच्या भरतीसाठी ऑनलाईन परीक्षेचे यशस्वी आयोजन

### १७ हजारांहून अधिक अर्ज, ११ हजारांहून अधिक उमेदवारांची परीक्षा

**नांदेड (प्रतिनिधी)** -डॉ. शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, विष्णुपुरी, नांदेड येथे वर्ग-४ मधील विविध ८६ रिक्त पदांच्या भरतीसाठी २५ ते ३१ जुलै २०२५ या कालावधीत ऑनलाईन पद्धतीने परीक्षा घेण्यात आली.

या भरती प्रक्रियेसाठी महाराष्ट्रातील विविध भागांतून १७,१४६ उमेदवारांनी अर्ज सादर केले होते, त्यापैकी ११,८६८ उमेदवारांनी प्रत्यक्ष परीक्षेत सहभाग घेतला. परीक्षेसाठी मुंबई, पुणे, संभाजीनगर, नागपूर, अमरावती, नांदेड या प्रमुख शहरांतील एकूण ११ परीक्षा केंद्रांवर ऑनलाईन परीक्षा आयोजित करण्यात आली होती.

परीक्षेचे आयोजन अत्यंत पारदर्शक व शिस्तबद्ध पद्धतीने पार पडले. प्रत्येक परीक्षा केंद्रावर जामर यंत्रणा, सीसीटीव्ही कॅमेरे व निरीक्षक नेमण्यात आले होते. त्यामुळे कोणताही अनुचित प्रकार न होता परीक्षा शांततेत पार पडली. या भरती प्रक्रियेतील पुढील टप्प्यांबाबत व परीक्षेचा निकाल महाविद्यालयाच्या अधिकृत संकेतस्थळावर लवकरच प्रसिद्ध करण्यात येणार आहे, अशी माहिती महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. एस. बी. देशमुख यांनी दिली.

## अ. भा. ब्राह्मण महासंघाच्या नांदेड दक्षिण महानगरप्रमुखपदी नांदेडकर

**नांदेड (प्रतिनिधी)**-अखिल भारतीय ब्राह्मण महासंघाच्या नांदेड (दक्षिण) महानगरप्रमुखदी केदार नांदेडकर यांची नियुक्ती करण्यात आली आहे. प्रदेशाध्यक्ष निखिल लातूरकर यांनी नांदेडकर यांना नियुक्तीपत्र प्रदान केले आहे.



देशभरातील समस्त ब्राह्मण बांधवांना एका छताखाली आणण्यासाठी अखिल भारतीय ब्राह्मण महासंघ कार्यरत असून, महाराष्ट्र प्रदेश अंतर्गत प्रत्येक ब्राह्मण कुटुंबापर्यंत पोहोचण्यासाठी महासंघाच्यावतीने समिती स्थापन करण्यात येत आहे.

येणाऱ्या काळामध्ये आपण तन, मन, धनाने संघटनेचे विस्तारीकरण आणि सबलीकरणमध्ये अधिक योगदान देवू, असे केदार नांदेडकर यांनी नियुक्तीनंतर सांगितले. त्यांची ही नियुक्ती एक वर्षासाठी असून या नियुक्तीबद्दल त्यांचे अभिनंदन होत आहे. या पदासाठी आपली नियुक्ती केल्याबद्दल नांदेडकर यांनी लातूरकर यांचे आभार मानले.




**नांदेड**-नवी दिल्लीतील जंतरमंतर मैदानावर ईपीएस-९५ पेन्शनर राष्ट्रीय समितीच्या वतीने मंगळवारी आंदोलन करण्यात आले. या आंदोलनात महाविकास आघाडीच्या खासदारांसह नांदेड लोकसभा मतदारसंघाचे खासदार रवींद्र वसंतराव चव्हाण यांनी सक्रिय सहभाग घेतला आणि या आंदोलनास आपला पाठिंबा जाहीर केला.

## सौ. इंदिराबाई बेटकर यांचे निधन

**नांदेड (प्रतिनिधी)**- लोहा तालुक्यातील वाळकी बुद्रुक येथील रहिवासी इंदिराबाई नागोराव बेटकर माली पाटील यांचे मंगळवार, दि. ५ ऑगस्ट रोजी दुपारी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर येथील स्मशानभूमीत बुधवार, दि. ६ ऑगस्ट रोजी दुपारी २ वाजता अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. त्यांच्या पश्चात पती, चार मुले, सुना, दोन मुली, जावई. नातवंडे असा परिवार असून, त्या येथील ग्रामपंचायतचे माजी सरपंच भगवानराव माली पाटील यांच्या व शेतकरी माधव, लक्ष्मण व बेटकर ॲग्रो एजन्सी मारतळा येथील रामराव माली पाटील यांच्या आई होत.



## आचार्य बाळकृष्ण यांचा जन्मदिवस आयुर्वेदिक वनस्पती व जडीबुटी वाटून साजरा



**मुखेड (प्रतिनिधी)** - आचार्य बाळकृष्ण यांचा जन्मदिवस आयुर्वेदिक वनस्पती व जडीबुटी वाटप करून साजरा करण्यात आला.

पतंजली योग भवनच्या वतीने प्राथमिक आरोग्य केंद्र बाऱ्हाळी येथे आयुर्वेदाचार्य आचार्य बालकृष्ण यांचा जन्मदिवस आयुर्वेदिक वनस्पतीची झाडे लावून व जडीबुटी वाटप करून साजरा करण्यात आला. पतंजली योग भवन बाऱ्हाळी येथे नियमित निशुल्क योग घेतला जातो. त्याचाच एक उपक्रम घेण्यात आला. योग गुरु सौ. संध्या मठदेवरु व सन्मुख मठदेवरु या परिवाराने बाऱ्हाळी परिसर व मुखेड तालुका योगमय करण्याचा संकल्प केला आहे.

सौ. संध्याताई मठदेवरु यांनी आयुर्वेदिक वनस्पतीविषयी माहिती सांगितली. यावेळी प्राथमिक आरोग्य केंद्र बाऱ्हाळीचे वैद्यकीय अधिकारी डॉ. अमीत मस्कले, औषध निर्माण अधिकारी धनराज मोरे, अशोक पाटील, दत्तात्रय तिपणे, साईनाथ कोटगिरे, उत्तम वाडीकर, सतीश गोरशेटवार, कैलास महाजन, वैभव विजापुरे, बालाजी जाधव, सूर्यकांत पाटील, विनोद वाघमारे, गणेश रेणगुंटवार, सौ. छाया गोरशेटवार, सौ. अल्का काशेटवार, सौ. ज्योती कोटापल्ले, सौ. मनीषा पवार, सौ. गंगासागर मुरमुरे आदींसह प्राथमिक आरोग्य केंद्र येथील रुग्ण उपस्थित होते.

## आधुनिक तंत्रज्ञानाचे न्यू एज कोर्सेस आता देगलूरमध्ये उपलब्ध

**नांदेड (प्रतिनिधी)**- कौशल्य, रोजगार, नाविन्यता व उद्योजकता विभागाचे मंत्री मंगल प्रभात लोढा यांच्या संकल्पनेतून सुरू करण्यात आलेल्या न्यू एज कोर्सेस योजनेंतर्गत देगलूर येथील अक्का महादेवी शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून सोलार टेक्निशियन (इलेक्ट्रिकल) या नवीन अभ्यासक्रमाची सुरूवात झाली आहे.

या कोर्ससाठी एकूण दोन युनिट असून एकूण ४० जागा उपलब्ध आहेत. या अभ्यासक्रमासाठी शैक्षणिक पात्रता ही किमान दहावी उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. सदर कोर्स आधुनिक तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात करिअर घडवण्याची सुवर्णसंधी देतो. विद्यार्थ्यांनी या कोर्ससाठी वेळेत नोंदणी करून प्रवेश घ्यावा, असे आवाहन संस्थेचे प्राचार्य, अक्का महादेवी शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, देगलूर, जि. नांदेड यांनी केले आहे.

## पानसरे महाविद्यालयाचे सी-झोन क्रॉस कंट्री स्पर्धेत वर्चस्व



**अर्जापूर (ता.बिलोली)**- स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड अंतर्गत सी-झोन क्रॉस कंट्री स्पर्धेचे आयोजन सायन्स कॉलेज नांदेड येथे करण्यात आले आहे. या स्पर्धेत अर्जापूर येथील पानसरे महाविद्यालयाच्या उमाकांत ठोंबरे या खेळाडूंनी वैयक्तिक स्पर्धेत द्वितीय क्रमांक पटकावला आहे.

तसेच सांघिक स्पर्धेत उमाकांत ठोंबरे, काशिनाथ वाघमारे, हैदर सय्यद, विलास दुगाने याने प्रथम क्रमांकासह सुवर्णपदक पटकाविले आहे. या सर्व खेळाडूंचे अभिनंदन हुतात्मा गोविंदराव पानसरे शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष नागनाथराव पाटील सावळीकर, उपाध्यक्ष राजेश्वर उत्तरवार, सचिव सुनील बेजगमवार, सर्व पदाधिकारी, प्र.प्राचार्य डॉ. गोविंद चौधरी, उपप्राचार्य डॉ. गोपाळ चौधरी, पर्यवेक्षक प्रा. शुद्धोधन गायकवाड, कार्यालयीन अधीक्षक राजेश्वर लापशेटवार, स्टाफ सेक्रेटरी प्रा.हणमंत मटके, क्रीडा संचालक डॉ. महेश वाकरडकर, डॉ. सुनील पाटील, डॉ. गजानंद कदम, डॉ. मोसीन खान तसेच सर्व प्राध्यापकवृंद, शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले आहे.

या स्पर्धेचे अध्यक्ष सायन्स कॉलेजचे प्राचार्य डॉ. लक्ष्मण शिंदे, क्रीडा संचालक डॉ. अश्विन बोरीकर, सलेक्शन कमिटीचे चेअरमन उस्मान गणी, सी- झोन सचिव डॉ. महेश वाकरडकर यावेळी उपस्थित होते.

## तहसीलदार मंजुषा भगत यांनी स्वीकारला पदभार

**उमरी (प्रतिनिधी)** -उमरी येथे तहसीलदार म्हणून मंजुषा भगत यांनी गुरुवारी पदभार स्वीकारला आहे



उमरीचे तहसीलदार प्रशांत थोरात यांची लातूर जिल्ह्यातील रेणापूर तालुका येथे बदली झाल्याने त्यांच्या जागी रेणापूर येथील तहसीलदार श्रीमती मंजुषा भगत ह्या उमरी येथे गुरूवारी रुजू झाल्याने तहसील प्रशासनाच्या वतीने त्यांचे स्वागत करण्यात आले.

यावेळी नायब तहसीलदार संजय देवराये, गटविकास अधिकारी व्ही. आर. आरबडवाड, मंडळ अधिकारी मंगेश वांगीकर, छाया बनसोडे, किरण कावळे, मंगला माने, महसूल अधिकारी प्रभाकर खानसोळे, अनिल वाघमारे, जय वनसागरे, दिलीप गंगासागरे, दीपक पांडे, सय्यद मुर्तुजा, देशपांडे, स्वितम गाढे, ए. ए. यन्नावार, बी. जी. कदम, महसूल सेवक दिलीप यम्मेवार, उत्तम हनवंते, शेख मोईज, शेख रईस यांनी स्वागत केले आहे.

**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.
फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड-(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ / मुंबई ९९६७०६२३५४ ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com